# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१८ / आषाढ २०, १९४० ( शके )**

**(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी आणि फलोत्पादन मंत्री**
**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७३**

---

### उसगाव, चांदीप (ता.वसई, जि.पालघर) येथील तानसा नदीच्या पात्रात वाळू उपशामुळे दोन मजुरांचा झालेला मृत्यू

**(१) * १२३६१८ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उसगाव, चांदीप (ता.वसई, जि.पालघर) येथील तानसा नदीच्या पात्रात सक्शन पंपाद्वारे वाळू काढणाऱ्या दोन मजुरांचा वाळूच्या ढिगाऱ्याखाली दबुन मृत्यू झाल्याचे दिनांक ४ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई तालुक्यात रेती माफिया आणि महसूल विभागातील संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषी अधिकारी व वाळू माफियांविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच मृत मजुरांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) दि.१/६/२०१८ रोजी मौजे उसगाव, ता.वसई, जि.पालघर येथे तानसा नदीपात्रात अनधिकृतपणे सक्शन पंपाद्वारे वाळू काढताना तानसा नदीपात्रात वाळूच्या ढिगाऱ्याखाली दबून एका इसमाचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

याप्रकरणी दि.२/६/२०१८ रोजी विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर मृत व्यक्ती अनधिकृतपणे वाळू उपसा करीत असतांना नदीपात्रात वाळूच्या ढिगाऱ्याखाली दबून मृत पावली असल्याने त्याच्या कुटुंबियास आर्थिक मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

वसई तालुक्यात रेती माफिया आणि महसूल विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने रेतीचे अवैध उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अस्वलीस्टेशन (ता.इगतपुरी, जि.नाशिक) जवळील ब्रिटीशकालीन दगडी पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(२) * १२३१२३ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अस्वलीस्टेशन (ता.इगतपुरी, जि.नाशिक) जवळील ब्रिटीशकालीन दगडी पुलाची दुरवस्था झाली असून अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे पुलाला हादरे बसत असल्याने पूल वाहतूकीसाठी धोकादायक झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचा सद्यस्थितीदर्शक अहवाल तातडीने शासनास पाठविणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांस सूचित करूनही कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. प्रश्नाधीन पूल सुस्थितीत आहे. तथापि, अवजड वाहनांच्या वाहतूकीमुळे पुलास कंपने निर्माण होत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, प्रश्नाधीन पूलाच्या रूंदीकरणाचे काम मंजूर असून निविदा निश्चिती व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पुनर्वसित गावठाणातील भूखंडांच्या मालकीबाबत

**(३) * १२३८६५ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाटबंधारे व इतर प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे गावठाण निर्माण करून या पुनर्वसित गावठाणामध्ये बाधित कुटुंबांना घर बांधण्यासाठी त्यांनी पूर्वी धारण केलेल्या जमिनीच्या भोगवटा स्थितीसह भूखंड मंजूर करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त व्यक्तीस पुनर्वसित गावठाणा मध्ये वाटप केलेला भूखंड हा त्याच्या मालकीचा असणे आवश्यक असताना भोगवटदार वर्ग-२ म्हणून भूखंड वाटप करण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याने भोगवटदार वर्ग-२ च्या भूखंडाचे भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याबाबत आणि सदर भूखंडाच्या हस्तांतरण व्यवहारावर असलेले निर्बंध उठविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी मागणी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने भोगवटदार वर्ग-२ च्या भूखंडाचे भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करून भूखंडाच्या हस्तांतरण व्यवहारावरील निर्बंध उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) महाराष्ट्र प्रकल्पबधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम १६(१) (ब) नुसार केवळ पाटबंधारे प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्त व्यक्तींना पुनर्वसित गावठाणा मध्ये घर बांधण्यासाठी त्यांनी पूर्वी धारण केलेल्या जमिनीच्या भोगवटा स्थितीसह नवीन गावठाणात भूखंड मंजूर करण्यात येतात.

(२), (३) व (४) होय. पाटबंधारे प्रकल्पामुळे/भुसंपादनामुळे विस्थापित झालेल्या बाधित व्यक्तीस पुनर्वसित गाठाणामध्ये भोगवटादार वर्ग-२ म्हणुन वाटप झालेल्या भुखंडाचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याबाबत व सदर भुखंडाच्या हस्तांतरण व्यवहारावर असलेले निर्बंध उठविण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी निर्देश दिले असुन त्यानुसार शासन निर्णय क्रमांक आरपीए-२०१८/प्र.क्र. १५७/र-१, दि १८.५.२०१८ निर्गमित करण्यात आला आहे.

-----------------

## पुगाव (ता.रोहा, जि.रायगड) हद्दीतील नम्रता ढाबा ते कांदले या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४) * १२२७५७ श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गालगतच्या पुगाव (ता.रोहा, जि.रायगड) हद्दीतील नम्रता ढाबा ते कांदले हा परिसरातील १९ गावांना जोडणारा व रहदारीसाठी महत्वाचा असलेला रस्ता असून हा रस्ता मोठ्या प्रमाणात उखडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे वाहतूकीस धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच याच मार्गावरील ऐनवहाल पुलाचीही दुरवस्था झाल्यामुळे गत वर्षीपासून पूल मोडकळीस आलेल्या अवस्थेत असून या १९ गावातील नागरिक सदर पूल व रस्त्यावरून जीवाचा धोका पत्करून प्रवास करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार नम्रता ढाबा ते कांदले या रस्त्याची दुरुस्ती करून रस्त्यावरील ऐनवहाल पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. सदर रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग क्षतिग्रस्त झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) प्रश्नांकीत रस्त्याच्या एकूण २३.४०० कि.मी. लांबीपैकी क्षतीग्रस्त लांबीमध्ये (कि.मी.१२/०० ते कि.मी.२०/५००) लहान पुलाच्या पुनर्बांधणीसह रस्त्याची सुधारणा करण्याचे काम मंजूर आहे. सदर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर काम हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळात प्रकाश सापळ्याच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरप्रकार

**(५) * ११७४५० श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडून प्रकाश सापळ्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याची मागणी एका सामाजिक कार्यकर्त्याने लेखी निवेदनाद्वारे मा.कृषी मंत्री यांच्याकडे दिनांक १० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार निविदा प्रक्रियेस स्थगिती देऊन गैरप्रकार करणाऱ्या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) महामंडळाच्या किटकनाशके विभागाची विक्री वाढविण्याच्या दृष्टीने खुल्या बाजारातील विक्रीकरीता प्रकाश सापळे, महामंडळाच्या “कृषि उद्योग” छाप्याखाली उत्पादित करुन घेण्याकरीता महामंडळाने दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी Expression of Interest (EOI) प्रसिध्द केलेले होते. EOI मध्ये सहभागी होण्याची अंतिम तारीख दि. १५ मार्च, २०१८ अशी होती. सदर निविदा प्रक्रिये मध्ये एकूण ६ उत्पादकांनी सहभाग घेतलेला आहे. उत्पादकांच्या उत्पादन केंद्रांची तपासणी अद्याप प्रलंबित असून, तांत्रिक निकष तपासून पूर्ण झालेले नसल्यामुळे दरपत्रके उघडण्यात आलेली नाहीत.

EOI बाबत एका सामाजिक कार्यकर्त्याने दिनांक १०/०३/२०१८ च्या ई-मेल द्वारे केलेली तक्रार प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदारास महामंडळाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयास भेट देवून शहानिशा करण्यासाठी दिनांक २६/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये बोलाविण्यात आलेले होते. परंतु, अद्याप तक्रारदाराने महामंडळाच्या कार्यालयास भेट दिलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बागमळागाव (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या बांधकामाबाबत

**(६) * ११६६७६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागमळागाव (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या बांधकामास आदेश क्र. प्लॉन २०१६/सीआर/५७५/ प्लॉन-३ दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ अन्वये शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी १ कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चाला मंजुरी देऊन सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात २१ लाख ७४ हजार रुपयांची तरतूद केली असतानाही अद्यापि सदरहू धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बंधाऱ्याच्या बांधकामास सुरुवात न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरहू धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय. हे खरे आहे. सदर कामाला रु.१.०० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली असून सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.२१.७४ लक्ष, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रु.१७.२१ लक्ष एवढी तरतूद करण्यात आली होती व सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रु.३.८१ लक्ष इतकी तरतुद

करण्यात आलेली आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडून किनारपट्टी क्षेत्र अधिनियम २०११ नुसार CRZ मंजूरी अप्राप्त असल्याने पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) येथील शिवणे ते नांदेड सिटीला जोडणारा नदीवरील पुल धोकादायक झाल्याबाबत

**(७) * ११६६१९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) येथील शिवणे ते नांदेड सिटीला जोडणारा नदीवरील पुल धोकादायक झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नादुरुस्त पुलावरून अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु असून पुल अतिशय जुना आणि जीर्ण झाल्याने पावसाळ्यात पाण्याखाली जाऊन कोणत्याही क्षणी दुर्घटना घडून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग, पुणे कार्यालयाकडून शासनाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या पुलाबाबत चौकशी तसेच पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट शासनाने केले आहे काय,
(५) असल्यास, चौकशी व स्ट्रक्चरल ऑडीटच्या अनुषंगाने सदर पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत खरे आहे. सदर कमी उंचीचा कॅाजवे हा आठमाही वाहतूकीकरीता संकल्पन केलेला आहे. त्यामुळे पावसाळ्यात जादा पाणी आल्यास कॅाजवे

पाण्याखाली जातो. हा कॅाजवे शहरालगत असल्याने जादा वाहनांची संख्या झाल्याने सिंगल लेन कॅाजवे वाहतूकीस अपूरा पडतो. सदर कॅाजवे कमकुवत नाही

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) कॅाजवे कमकुवत झालेला नसल्याने जिल्हा परिषदेमार्फत स्ट्रक्चरल ऑडीट करणेत आलेले नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयात बोंड अळीमुळे कापूस पिकाच्या झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई देण्याबाबत

**(८) * १२३४९३ अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील अमरावती, भातकुली व इतर तालुक्यातील ४६ महसूल मंडळाचे उत्पन्न पिक कापणी प्रयोगात ५ वर्षाची सरासरी जास्त दर्शविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे बोंडअळीने कापूस पिकांचे नुकसान होऊनही येथील शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ४६ मंडळातील शेतकऱ्यांचा समावेश बोंडअळीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसान भरपाईत करावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा कृषी अधिक्षक, अमरावती यांना दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने सदर मंडळातील शेतक-यांना बोंडअळीने कापुस पिकाच्या झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) अमरावती जिल्हयातील कापूस पिकाखालील ३३ टक्के पेक्षा अधिक बाधित झालेले एकूण क्षेत्र १९९१७३ हे. इतके असून ते संयुक्त पंचनामा अहवालानुसार निश्चित करण्यात आलेले आहे. बाधित शेतकऱ्यांना महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभागाच्या शासन निर्णय क्र. सिएलएस २०१७/- प्रक्र ३२०/म-३ दि. १७/३/२०१८ अन्वये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रुई-कबनूर (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(९) * १२११९९ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुई-कबनूर (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्ता वाहतूकीस धोकादायक झाला असून त्यामुळे रस्त्यावर अपघात घडून अद्यापपर्यंत तीन नागरिकांचा जीव गेला असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर स्ट्रीट लाईट नसल्यामुळे रात्रीच्या वेळी लूटमारीच्या घटना घडण्यात वाढ होऊन त्या प्रकारच्या अनेक घटना घडल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून रस्त्यावर स्ट्रीट लाईट लावण्याबाबत तसेच रस्त्यावर लुटमार करणाऱ्यांना आळा बसण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्नांकीत विकासवाडी हलसवडे सांगवडे पट्टकोडोली इंगळी रुई कबनुर हा रस्ता प्रजिमा २१ असा आहे. सदर रस्ता सुस्थितीत असून या रस्त्यावर कोणताही गंभीर अपघात होऊन जीवीतहानी झाल्याची तसेच लुटमार झाल्याच्या गुन्हयांची नोंद पोलीस दप्तरी नाही. हा रस्ता ग्रामपंचायत हद्दीतून जात असल्याने स्ट्रीट लाईट बसवण्याची कार्यवाही करण्याबाबत ग्रामपंचायतीस विभागामार्फत कळविण्यात आले आहे. सद्य:स्थितीत रुई कबनुर रस्ता सुस्थितीत असून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील गारपीटग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१०) * ११८५६२ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नादेंड जिल्हयातील हिमायतनगर व नांदेड या तालुक्यांसह अनेक तालुक्यांत माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे व नागरीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील नुकसानग्रस्तांचा सर्वे करताना चुकीच्या पध्दतीने पंचनामे केल्यामुळे सर्वेक्षणात विसंगती निर्माण होऊन अनेक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या लाभापासून वंचित राहावे लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्वेक्षणातील विसंगती दूर करुन मदतीपासून वंचित राहिलेल्या गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर व नांदेड तालुक्यांसह अनेक तालुक्यांत माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये झालेल्या गारपीटीमुळे या भागातील शेतकऱ्यांचे व नागरीकांचे नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(२) नाही.
(३) माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये नांदेड जिल्ह्यात गारपीटीमुळे झालेल्या शेतीपिके व फळपिकांच्या नुकसानीसाठी आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत वाटप करण्याकरीता शासन निर्णय दिनांक ०३.०३.२०१८ अन्वये रु.१८.६८कोटी एवढे अनुदान मंजूर करण्यात आले. त्यानुसार रु. १३.९० कोटी इतकी रक्कम आपदग्रस्त शेतकऱ्यांना तहसिलस्तरावरुन वाटप करण्यात आली असून उर्वरित निधी शासनास समर्पित करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंदी रेल्वे (ता.सेलू, जि.वर्धा) येथे उड्डाणपुलाच्या बांधकामात अनियमितता झाल्याबाबत

**(११) * १२२८६६ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदी रेल्वे (ता.सेलू, जि.वर्धा) येथे उड्डाणपुलाच्या सुरु असलेल्या बांधकामात दिनांक २६ जुलै, २०१६ रोजीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णयान्वये फ्लाय ॲशच्या विटा वापरणे बंधनकारक असताना जनावरांच्या दवाखान्यासमोरील बांधण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाच्या भिंतीमध्ये (वॉल कम्पाऊंडमध्ये) मातीच्या विटांचा वापर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरप्रकार करून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सेलू यांनी शासन निर्णयाचे उल्लंघन केले असुन नियमाप्रमाणे काम केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी स्थानिक नागरिकांनी दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर वॉल कंपाऊंडच्या पुनर्बांधणीचे काम उड्डाणपुलाचे बांधकामाचे कामात समाविष्ट नाही.

(२), (३) व (४) स्थानिक नागरीकांनी याबाबत दिनांक १६/०४/२०१८ रोजी तक्रार केली होती.

सदर ठिकाणी ३०.०० मीटर लांबीच्या कुंपन भिंतीचे पुनर्बांधकाम कंत्राटदाराने मातीच्या विटांचा वापर करून काम सुरू केले होते. तथापि, सदरहू बांधकाम काढण्यात आले असून सदर बांधकाम फ्लाय ॲशच्या विटांचा वापर करून करण्यात आले आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर-ताडोबा या रस्त्याला राज्यमार्गाचा दर्जा देऊन रस्ता दर्जोन्नत करण्याबाबत

**(१२) * ११८५११ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद),**

**श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील प्रमुख पर्यटन स्थळ असलेल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात येणा-या पर्यटक, भाविक व नागरीकांच्या सोयीसाठी नागपूर-ताडोबा या ८७ कि.मी. लांबीच्या मार्गाला राज्यमार्गाचा दर्जा देऊन रस्ता दर्जोन्नत करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक ०२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार नागपूर-ताडोबा या रस्त्याला राज्यमार्गाचा दर्जा देऊन रस्ता दर्जोन्नत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) मुख्य अभियंता, सा.बां.प्रा. विभाग, नागपूर यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावामधील त्रुटींची पूर्तता पूर्ण करुन नियम व निकषांच्या अधीन राहून विषयांकित रस्ता दर्जोन्नत करण्याविषयी कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंडणगड ते खेड (जि.रत्नागिरी) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१३) * १२३४८३ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरार-खेड (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या राज्यमार्गावरील मंडणगड ते खेड या टप्प्यातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तीन महिन्यांपूर्वीच केले असतानाही मंडणगड ते खेड या रस्त्यावर खड्डे पडल्याने सदर काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा निष्कर्ष निघत असून खड्ड्यामुळे रस्त्यावर अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या रस्त्याची दुरुस्ती करून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) प्रश्नांकित रस्त्यावर डिसेंबर २०१७ मध्ये खड्डे भरण्यात आले होते. या रस्त्याच्या काही लांबीत नव्याने पडलेले खड्डे माहे एप्रिल २०१८ मध्ये भरण्यात आले आहेत.

प्रश्नांकित रस्त्याच्या कि.मी ००/०० ते कि.मी. ३४/४०० या लांबीमध्ये सुधारणा करण्याचे काम हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत मंजूर असून सदर कामाची निविदा बोलावण्यात आली असता, कंत्राटदाराकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही.

रस्त्याच्या क्षतिग्रस्त झालेल्या काही लांबीतील सुधारणा करण्याच्या कामास विशेष दुरुस्ती कार्यक्रमातंर्गत मंजूरी प्राप्त असून, कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. निविदा निश्चिती झाल्यावर पावसाळयानंतर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंमळनेर (जि.जळगांव) येथे निकृष्ट दर्जाचे बियाणे जप्त केल्याबाबत

**(१४) * १२१५०१ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंमळनेर (जि.जळगांव) शहरात निकृष्ट दर्जाचे बियाणे विक्रीसाठी येत असल्याच्या मिळालेल्या माहिती आधारे कृषी विभाग व पोलीस पथकाने संयुक्त कारवाई करुन चार जणांना अटक केली असुन त्यांच्याकडून २ लाख २४ हजार दोनशे वीस रुपयांचे निकृष्ट दर्जाचे बियाणे दिनांक २७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून अधिक मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांचे विक्री परवाने रद्द करण्यासह त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदर घटनेची चौकशी करण्यात आलेली आहे. तसेच, अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून बनावट कापूस बियाणांची ३०४ पाकीटे जप्त करण्यात आलेली आहेत.

(३) सदर प्रकरणी अंमळनेर, पोलीस स्टेशन येथे नोंद क्रमांक ११२/२०१८ अन्वये विविध अधिनियमांखाली गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पोलीस यंत्रणेमार्फत पुढील तपास सुरू आहे. सदर प्रकरणातील आरोपी हे परवानाधारक कृषि केंद्र चालक नसल्याने परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील मच्छीमारांना ओखी चक्रिवादळात झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१५) * ११७३६६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टीवर माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आलेल्या ओखी चक्रिवादळात नुकसान झालेल्या रत्नागिरी जिल्हयातील ७५ नुकसानग्रस्त मच्छीमारांच्या ७२ लाख रूपयांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मच्छीमारांना सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरीही भरपाईची रक्कम शासनाकडून अदा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये मच्छीमार बोटींचे व जाळीच्या नुकसानीसाठी मदत जाहीर केली असून, त्यानुसार बाधित मच्छीमारांना मदत देण्यासाठी रु. ७५.४१ लाख इतका निधी वितरीत करण्याची बाब प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात वादळी वारा व गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(१६) * १२०११६ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून त्यांना शासनाकडून कोणतीही मदत देण्यात आली नसल्याचे दिनांक १२ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नुकसानीचा सर्वे करुन अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालाच्या आधारे शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) होय.

(३) माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये बुलढाणा जिल्ह्यात गारपीटीमुळे झालेल्या शेतीपिके व फळपिकांच्या नुकसानीसाठी आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत वाटप करण्याकरीता शासन निर्णय दिनांक ०३.०३.२०१८ अन्वये रु.४४.६६ कोटी एवढे अनुदान मंजूर करण्यात आले. त्यानुसार रु.३९.४६ कोटी इतकी रक्कम आपदग्रस्त शेतकऱ्यांना तहसिलस्तरावरुन वितरीत करण्यात आली असून उर्वरित निधी शासनास समर्पित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील शेतकरी पंतप्रधान पीक विमा योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(१७) * १२३५०९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील ६ लाख ९१ हजार शेतकऱ्यांनी पंतप्रधान पीक विमा योजनेंतर्गत रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीकडे ३१ कोटी ५९ लाख रुपयांचा विमा हप्ता भरला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांच्या पीकांचे नुकसान होऊनही रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीने या शेतकऱ्यांचा परतावा नामंजूर केल्यामुळे या कंपनीविरुध्द जनसुनावणी घेण्याबाबत मागणी शेतकरी संघर्ष समितीने भारतीय विमा नियामक प्राधिकरणाकडे (आयआरडीए) माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व इतर अधिकारी यांनी या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीक विम्यासंदर्भातील कार्यवाही योग्य प्रकारे केली नसल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपासून वंचित रहावे लागल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा अहवाल जिल्हाधिकारी, परभणी यांनी कृषी आयुक्त यांच्याकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) परभणी जिल्हयातील खरीप हंगाम २०१७ मध्ये ७ लाख शेतकऱ्यांनी रुपये ३१.३७ कोटी विमा हप्ता भरुन प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभाग घेतलेला होता.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, परभणी यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी परभणी, यांची चौकशी करणेबाबतचा अहवाल आयुक्त (कृषि) यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे.

(४) या प्रकरणी चौकशी करणेबाबत विभागीय कृषि सह संचालक लातुर यांना शासन स्तरावरुन कळविण्यात आलेले असून, त्यांचा चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(५) चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील वस्तुस्थिती विचारात घेवून दोषींवर उचित कारवाई करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील इमारतींच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(१८) * १२३३९५ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नोंदणी कार्यालयासमोरील संजय गांधी निराधार योजना कार्यालय व आधार भवन या दोन इमारतीच्या बळकटीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २ जुन, २०१६ रोजी वा त्यासुमारास तांत्रिक मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही कामांची प्रत्येकी किंमत २ लाख ९९ हजार रुपये असून दिनांक २७ जुन, २०१६ रोजी वा त्यासुमारास या दोन्ही कामांची निविदा प्रकाशित करण्यात आली आहे व निविदा प्रकाशित झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी सदरची दोन्हीही कामे पूर्ण झाल्याबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील संजय गांधी निराधार योजना कार्यालय व आधार भवन या दोन्हीही इमारती एकच असून केवळ त्यांची नावे वेगळी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून या प्रकरणातील सबंधित दोषीं अधिकारी व इतर संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

शहरी भागासाठी संजय गांधी निराधार योजना ही आधार भवन येथे कार्यरत आहे आणि ग्रामीण भागासाठी संजय गांधी निराधार योजना ही तहसिल कार्यालय इमारतीच्या एका भागात कार्यरत आहे. आधार भवन आणि तहसिल कार्यालय हया दोन वेगळया इमारती आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बियाणे पुरवठ्याकरीता शेतकरी उत्पादक कंपन्यांना अग्रक्रम देण्याबाबत

**(१९) * ११७६३९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या बाबतीत कृषी विभागात वरिष्ठ स्तरावर ताठर व असहकाराची भूमिका माहे जानेवारी, २०१७ पासून घेण्यात आल्यामुळे सहकार व परस्पर संबंध या तत्वावर काम करणाऱ्या या संस्थांची व्यावसायिक गती मंदावल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी उत्पादक कंपन्या या सामाजिक उद्यमशीलता जोपासणाऱ्या व्यावसायिक संस्था असल्याने शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्या असुन आपल्या मागण्या सनदशीर व कायदेशीर मार्गाने पूर्ण होत नसल्याने त्यांनी मा.कृषी मंत्री यांच्या घरासमोर दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६-१७ या वर्षापर्यंत शासनाच्या महामंडळाप्रमाणे शेतकरी उत्पादक कंपन्यांना उत्पादन व वितरण अनुदान दिले जात असताना सदरचे अनुदान सन २०१७-१८ पासून बंद करण्यात आले असून ते केवळ शासकीय महामंडळानाच देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(५) असल्यास, त्यानुसार शेतकरी उत्पादक कंपन्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. वस्तुत: केंद्र शासनाच्या संबंधित योजनांच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये पिक प्रात्यक्षिकांतर्गत बियाणे पुरवठयाकरीता शेतकरी उत्पादक कंपन्यांना अग्रक्रम देण्याची कोणतीही तरतूद नसतांना, सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये तत्कालिन कृषी संचालकांनी त्यांच्या स्तरावरुन निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांना अग्रक्रम देण्याची तरतूद समाविष्ट केली होती, जी योजनेच्या मूळ मार्गदर्शक सूचनेशी विसंगत होती. बऱ्याच शेतकरी उत्पादक कंपन्यांनी त्यांचे सभासद नसलेल्या शेतकऱ्यांकडून कंत्राटी पध्दतीने बियाणे उत्पादन करुन घेतलेले होते.

सबब, शेतकरी उत्पादक कंपन्यांना अग्रक्रम देण्याची योजनेच्या मार्गदर्शक सूचनेशी विसंगत असलेली तरतूद सन २०१७-१८ पासून रद्द करण्यात आली आहे.

(२) काही शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींनी तत्कालिन मा.मंत्री (कृषी) यांच्या घरासमोर दिनांक ३१ मार्च,२०१८ रोजी आंदोलन केले आहे.

(३) मूलत: सन २०१७-१८ मध्ये योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वितरीत करावयाच्या बियाण्यांच्या लक्षांकापेक्षा अधिक बियाण्यांची शासकीय संस्थांकडे (राष्ट्रीय बिज निगम (NSC), हिंदुस्थान इन्सेक्टीसाईड लि. कृभको) उपलब्धता असल्याने अन्य कोणत्याही संस्थेमार्फत बियाणे वितरणाचा प्रश्न उपस्थित झाला नाही.

(४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापी, योजनेच्या मूळ मार्गदर्शक सूचनेशी विसंगत कृषी आयुक्तालयाने विहीत केलेली तरतूद बंद करण्यात आली आहे.

(५) शेतकरी उत्पादक कंपन्यांना आपल्या सभासदांमार्फत बियाणे उत्पादन करुन त्यांनी त्यांची गरज भागविणे व अतिरिक्त बियाणे बाजारपेठे मध्ये विक्री करण्यास पूर्ण मूभा आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे लाहे (ता.शहापूर, जि.ठाणे) परिसरातील पर्यावरण संवेदनशील व हरित क्षेत्रामध्ये अनधिकृत उत्खनन केल्याबाबत

**(२०) * ११८०५८ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लाहे (ता.शहापूर, जि.ठाणे) परिसरातील गट नंबर ५०१, ४८० ब पैकी ४९१, ४८१, ४९७ या पर्यावरण संवेदनशील व हरित क्षेत्रामध्ये विकासक अनधिकृत उत्खनन करीत असल्याबाबत मा.महसूल मंत्री तसेच सचिव, महसूल विभाग यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या व उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मौजे लाहे येथील पर्यावरण संवेदनशील व हरित क्षेत्रामध्ये अनधिकृत उत्खनन करणाऱ्या विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) दि.७/३/२०१८ रोजी सदर आशयाचे निवेदन लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री (महसूल) यांना दिले आहे.

(२) व (३) मौजे लाहे, ता.शहापूर, जि.ठाणे येथील गट नं. ४९१ या जमिनीमधून गौण खनिजाचे उत्खननाप्रकरणी संबंधितांनी केलेल्या खुलाश्यामध्ये सदर उत्खननामधील गौण खनिज त्याच जमिनीच्या सपाटीकरणाकरीता वापरल्याचे नमुद केले आहे. हा खुलासा मान्य करुन तहसीलदार, शहापूर यांनी दंडात्मक कारवाईची नोटीस रद्द केली आहे. तसेच मौजे लाहे येथील गट नं.५०१, ४८०/ब, ४८१, ४९१ व ४९७ या जमिनीमधून झालेल्या उत्खननाबाबत आपले सरकार पोर्टलद्वारे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, शहापूर यांनी केलेल्या चौकशीमध्ये गट नं.५०१, ४८०/ब पैकी ४८१, ४९१ व ४९७ जमिनीमधून केलेल्या उत्खननामधील गौण खनिज त्याच जमिनीच्या सपाटीकरणाकरीता वापरल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील कृषी अधिकाऱ्यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली अटक

**(२१) * १२१४५५ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील भातशेती दुरुस्तीचे काम करणाऱ्या एका ठेकेदाराचे ३० लाख रुपयांचे देयक काढण्यासाठी साडे तीन लाख रुपयांची लाच घेताना कृषी विभागातील दोन कृषी अधिकाऱ्यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास रंगेहात पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. आरोपी लोकसेवक श्री.आबासाहेब महादू वाकचौरे, मंडळ कृषि अधिकारी, अंबाडी तथा प्रभारी तालुका कृषि अधिकारी, भिवंडी, जि.ठाणे यांना दिनांक २५.५.२०१८ रोजी रु.२,४०,०००/- व रु.१,००,०००/- चा कोरा धनादेश घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. तद्नंतर श्री.आबासाहेब महादू वाकचौरे, मंडळ कृषि अधिकारी, अंबाडी तथा प्रभारी तालुका कृषि अधिकारी, भिवंडी, जि.ठाणे व श्री.नवनाथ रावण गरड, कृषि पर्यवेक्षक, चाविंद्रा, तालुका कृषि अधिकारी, भिवंडी, जि.ठाणे यांना दिनांक २६.५.२०१८ रोजी अटक केली आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी संबंधितांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. त्याअनुषंगाने आरोपी लोकसेवक श्री.नवनाथ रावण गरड, कृषि पर्यवेक्षक, चाविंद्रा, तालुका कृषि अधिकारी, भिवंडी, जि.ठाणे यांना विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे यांचे आदेश दिनांक २९.५.२०१८ अन्वये शासनसेवेतून निलंबित केले आहे. तसेच आरोपी लोकसेवक श्री.आबासाहेब महादू वाकचौरे, मंडळ कृषि अधिकारी, अंबाडी तथा

प्रभारी तालुका कृषि अधिकारी, भिवंडी, जि.ठाणे यांना दिनांक ३०.६.२०१८ च्या शासन आदेशान्वये शासनसेवेतून निलंबित करण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी विभागीय चौकशीची कार्यवाही आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या स्तरावर प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपळखुटी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील पैनगंगा नदीतून अवैध रेती उपसा करण्यात येत असल्याबाबत

**(२२) * ११९७३४ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळखुटी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील पैनगंगा नदीतून रेतीचा उपसा करून तेलंगणा राज्यात मोठ्या प्रमाणात रेती वाहतूक करण्यात येत असून याप्रकरणी महसूल विभागाने कारवाई करून दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातही मोठ्या प्रमाणात रेतीची अवैध वाहतूक करण्यात येत असल्यामुळे त्यावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून पिंपळखुटी येथील पैनगंगा नदीतून रेतीचा उपसा करून तेलंगणा राज्यात वाहतूक करणाऱ्या व घाटंजी तालुक्यात रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या रेती तस्करांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यात अवैधरित्या रेतीउपसा होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या आहेत.

(३) मौजे पिंपळखुटी, ता.केळापूर येथे पैनगंगा नदीतून वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत निदर्शनास आले नाही. घाटंजी तालुक्यात माहे एप्रिल ते मे, २०१८ या कालावधीत वाळूची अवैध वाहतूकीच्या ७ प्रकरणांत दंडात्मक कारवाई करुन रु.१,१५,६००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तालुकास्तरावर पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकांमार्फत माहे एप्रिल ते मे,२०१८ या कालावधीत यवतमाळ जिल्हयात गौण खनिजाचे अवैध उत्खन व वाहतूकीच्या ३९ प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रु.२८,२६,८५४/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोथेरी (ता.महाड, जि.रायगड) गावातील दगड खाणीवर कारवाई करण्याबाबत

**(२३) * १२२९६८ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथेरी (ता.महाड, जि.रायगड) गावात असलेल्या दगड खाणीमध्ये सुरुंग लावून उत्खनन करण्यात येत असून या सुरुंगाच्या हाद-यांमुळे गावातील घरांना व रहिवाशांना धोका निर्माण झाल्याचे तसेच अनेक घरांना तडेही गेले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील रहिवाशांनी सदर खाणी बंद करून खाण मालकांवर कारवाई करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर खाणी बंद करून खाण मालकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे कोथेरी, ता.महाड जि.रायगड येथील दगडखाणीमध्ये होणाऱ्या सुरुंग स्फोटामुळे तेथील तक्रारदार यांनी त्यांच्या घराला हादरे बसून तडे गेल्याची दि.१७/०१/२०१८ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार, महाड यांनी घटनास्थळावर प्रत्यक्ष जाऊन केलेल्या चौकशीमध्ये तक्रारदार यांच्या घरास तडे गेल्याचे निदर्शनास आले नाही.

मौजे कोथेरी, ता.महाड येथील स.नं.११९/१९ क्षेत्र ३.०४.०० हे.आर मधील दगडखाणीतून उत्खननास माहे जानेवारी, २०१८ नंतर परवानगी देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बिरदोले (ता.कर्जत, जि.रायगड) परिसरात वाहणाऱ्या उल्हास नदीवर पूल बांधण्याबाबत

**(२४) * १२०४५६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिरदोले (ता.कर्जत, जि.रायगड) परिसरात वाहणाऱ्या उल्हास नदीवर पूल बांधण्याबाबत परिसरातील पोशीर, बिरदोले, कोदीवले, अवसरे, वरई या गावातील ग्रामस्थांनी गत ५ वर्षाहून अधिक कालावधीपासून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रायगड, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कर्जत, मा.पालकमंत्री, रायगड, जिल्हाधिकारी, रायगड, मा.सार्वजानिक बांधकाम मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असून दहीवली ग्रामपंचायतीने ठराव पास करून शासनाकडे सादर केला असतानाही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावातील नोकरदारांना तसेच उद्योग व्यवसायासाठी नागरिकांना उल्हासनगर, बदलापूर याठिकाणी जावे लागत असून पूला अभावी त्यांना बिरदोली दरम्यान उल्हास नदीवर टाकलेल्या सिमेंट खांबांवरून धोकादायकरित्या नदी पार करावी लागत असल्याचे व रात्रीच्या वेळी

सिमेंटच्या खांबांवरून ये-जा करताना अंदाज न आल्याने पाण्यात पडून नागरिक मृत्यूमुखी पडल्याच्या अनेक घटना घडल्याचे तसेच दैनंदिन जीवनातही पुलाभावी त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार व ग्रामस्थांच्या मागणीनुसार उल्हासनदीवर बिरदोले येथे पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** : (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) नागरिकांना पुलाअभावी दैनंदिन जीवनात समस्यांना सामोरे जावे लागते हे खरे आहे. परंतु नागरिक मृत्यूमुखी पडल्याच्या घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्नांकित पुलाची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्नांकित ठिकाणी नवीन मोठा पूल बांधणे आवश्यक आहे. या पूलासाठी जोडरस्त्यांसह अंदाजे रु.४.५० कोटी निधीची आवश्यकता आहे. विषयांकित पूल हा योजनाबाह्य रस्त्यावर असल्याने त्यावर शासनाच्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन देता येत नाही. तसेच जिल्हा परिषदेकडील विविध योजनांतर्गत प्राप्त निधीचे स्त्रोत पहाता इतका मोठा निधी प्राप्त करुन देणे शक्य नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शीव-पनवेल महामार्गावरील वाशी खाडीवरील पुलाच्या बांधकामाबाबत

**(२५) * ११७२३५ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शीव-पनवेल महामार्गावरील वाशी खाडीवरील १८०० मीटर लांबीच्या तिसऱ्या पुलाच्या ७७७ कोटी रुपये खर्चाच्या कामास रस्ते विकास महामंडळाने सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाडी पुलाचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या पुलाला लागणाऱ्या खर्चासाठी सिडको २०० कोटी रुपये पुरविणार असतानाही पुलाचा खर्च वसूल करण्यासाठी रस्ते विकास महामंडळाने टोल कंपनीला सन २०२६ ऐवजी सन २०३६ पर्यंत टोल वसुलीची मुदतवाढ दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टोल वसुलीला मुदतवाढ देण्याची कारणे काय आहेत तसेच सदर पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) शीव-पनवेल महामार्गावरील वाशी खाडीवरील तिस-या पुलाचे बांधकामास दि.२४.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाची किंमत रु.७७५.५८ कोटी आहे.

(२) कार्यारंभ आदेशानंतर ३६ महिने कालावधीमध्ये सदर पुलाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) सिडको तर्फे पुरविण्यात येणारे रु.२०० करोड Equity म्हणून देण्यात येणार आहेत. महामंडळास हे रु.२०० करोड रुपये सिडकोस Equity वर मिळणाऱ्या परताव्यासह परत करावयाचे आहेत. सिडकोच्या गुंतवणकीची परतफेड व नव्याने बांधावयाच्या तिसऱ्या पुलाच्या प्रकल्पाकरीता उभारण्यात येणाऱ्या कर्जाची व्याजासकट परतफेड करण्याकरीता सप्टेंबर २०३६ पर्यंत टोल वसुलीसाठी सवलत कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

(४) या प्रकल्पाच्या बांधकामावरील खर्च, देखभाल, दुरुस्ती व परिचालन आणि इतर अनुषंगिक खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी तसेच उभारलेल्या कर्जाची परतफेड करण्याकरीता सवलत कालावधी शासनाने माहे सप्टेंबर २०३६ पर्यंत

निश्चित करण्यास दि.२४.११.२०१७ चे शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. काम तातडीने पुर्ण करण्याकरीता महामंडळाने EPC तत्वावर निविदा काढल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कापसाच्या निकृष्ट दर्जाच्या बीटी बियाण्यांमुळे झालेले नुकसान

**(२६) * १२१५३५ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे गत वर्षाच्या खरीप हंगामात ६ कंपन्यांच्या कापसाच्या सदोष बीटी बियाणांमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नुकसान भरपाईची आवश्यक कागदपत्रे शेतकऱ्यांनी विभागाकडे सादर करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर कंपन्यांवर कारवाई करण्यासाठी कृषि विभागास वरिष्ठांकडून परवानगी देण्याकरिता टाळाटाळ होत असल्याची तक्रार स्थानिक शेतकऱ्यांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यासह उक्त कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

अकोला जिल्ह्यात खरीप हंगाम २०१७ मध्ये कापूस पिकावर शेंदरी बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. या संदर्भात महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम २००९ व नियम २०१० खाली नुकसानभरपाई मिळण्याबाबत अकोला जिल्ह्यातून ३३,३९२ शेतकऱ्यांनी तक्रार अर्ज दाखल केलेले आहेत. त्याबाबत कायद्यातील तरतूदीनुसार कार्यवाही चालू आहे.

(२) व (३) महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम २००९ व नियम २०१० या अधिनियमातील तरतूदीनुसार बियाणे कंपन्यांमार्फत नुकसान भरपाई देण्याबाबतचा प्रस्ताव नियंत्रक तथा कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांच्याकडे सादर करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील चिपळे पुलाची दुरूस्ती करण्याबाबत

**(२७) * १२०९२४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात १९७५ साली बांधलेला चिपळे पुल हा चिपळे, कोप्रोली-नेरे, शांतीवन, वाजे व धोदाणी या गावांसह आदिवासी वाडयांना जोडणारा महत्वाचा पूल असून या पुलाची दूरवस्था झाल्यामुळे पुलावरून वाहतूक करणे धोकादायक झाले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलावरून दररोज मोठया प्रमाणात वाहने प्रवास करित असून पुलाच्या खालच्या बाजूच्या लोखंडी सळया दिसू लागल्याने पूल खचण्याची अथवा पुलावरून वाहतूक करताना भविष्यात मोठा अपघात घडून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदर पुलाची तातडीने दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर पुलावरुन मोठया प्रमाणात वाहतूक सुरु असून पुलाच्या स्लॅबच्या खालील बाजूस काही भागामध्ये स्टील बाहेर आलेले आहे.

(३), (४) व (५) प्रश्नांकीत पुलाची मे. लडगे प्रोजेकटस ॲण्ड टेक्नोलॉजी प्रा.लि. या सल्लागारामार्फत पाहणी केली असून, पाहणी अहवालानुसार, सदर पुल धोकादायक नसून, वाहतुकीस सुस्थितीत आहे, तथापि पुलाची किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे अहवालात नमूद केले आहे.

पुलाच्या दुरुस्तीचे काम मंजूर असून निविदास्तरावर आहे. निविदा निश्चित झाल्यानंतर काम हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## भरणे-खेड (ता.खेड, जि.रत्नागिरी) या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाबाबत

**(२८) * १२२५०६ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भरणे-खेड (ता.खेड, जि.रत्नागिरी) या रस्त्याच्या १ कि.मी. लांबीच्या चौपदरीकरणाचे काम ठेकेदार व संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या दुर्लक्षितपणामुळे बंद पडल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम अर्धवट अवस्थेत बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) प्रश्नांकित भरणे-खेड रस्त्याच्या कि.मी.२८/०० ते कि.मी. २९/०२० या १ कि.मी. लांबीमध्ये चौपदरीकरणाचे काम मंजूर आहे. मंजूर निविदेप्रमाणे रस्त्याच्या ७०० मीटर लांबीमध्ये

चौपदरीकरणासाठीचे मातीकाम, रुंदीकरण, खडीकरण व एमपीएमचे काम पूर्ण झाले आहे. परंतू अस्तित्वातील लांबीतील विद्युतपोल व वाहिन्या स्थलांतरीत न झाल्यामुळे तसेच नवीन माती भरावावर खडीकरण व मजबूतीकरणाचे काम केले असल्यामुळे डांबरीकरणाचे (बीएम व बीसी) काम ठेकेदाराकडून पावसाळयानंतर पूर्ण करुन घेण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत सदर रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचे सातबारा उताऱ्यावर नाव लावण्याबाबत

**(२९) * ११७८४४ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील १७ हजार ५०० आदिवासींच्या ताब्यात असलेले क्षेत्र व त्यांना देण्यात आलेल्या ताबा प्रमाणपत्रात नमूद केलेल्या क्षेत्रात तफावत असल्यामुळे गत ८ वर्षापासून या आदिवासींचे सातबारा उता-यावर नाव लागत नसल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाकडे असलेल्या एकूण जमिनीपैकी किती जमिन आदिवासींकडे आहे याबाबतची माहिती वन विभागाने दिली नसल्यामुळे सातबारा उता-यावर नाव लावता येत नाही,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार वन विभागाकडून नाशिक जिल्ह्यातील आदिवासींच्या जमिनीची माहिती मिळवून त्यांचे सातबारा उताऱ्यावर नाव लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) नाशिक जिल्हयात एकूण १७ हजार ५५१ आदिवासीना प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत. सदर १७ हजार ५५१ वनहक्क धारकांपैकी ९०९५ वनहक्क धारकांची ७/१२ सदरी इतर हक्कात नोंद घेण्यात आलेली आहे.

उर्वरित ८४५६ वनहक्क धारकांच्या मागणी क्षेत्रामध्ये व मंजूर क्षेत्रामध्ये तफावत असल्याने दावेदाराच्या क्षेत्राची GPS मोजणी करुन सन २००५ पुर्वीचे क्षेत्र निश्चित झाल्यानंतर उर्वरित ८४५६ वनहक्क धारकांची ७/१२ सदरी नोंद घेण्याची तजवीज ठेवली असल्याचे जिल्हाधिकारी, नाशिक यांनी कळविले आहे.

-----------------

## नायगाव (ता.वसई, जि.पालघर) खाडीवरील पूलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३०) * १२३५८७ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (ता.वसई, जि.पालघर) खाडीवरील पूलाचे काम गत अनेक वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असून सदर काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर पूलाचे काम अपूर्ण अवस्थेत राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन पुलाच्या आखणीमध्ये एम.एम.आर.डी.ए. कडून नायगाव पूर्व-पश्चिमेस जोडणाऱ्या रेल्वे उड्डाण पुलाच्या जूचंद्र बाजूकडील (पूर्वेकडील) नियोजित पोहोचमार्गाची आखणी येत असल्याने, पुलाच्या

पोहोचमार्गाच्या आखणीमध्ये बदल करावा लागत असून पोहोचमार्गाची लांबी १०० मी. ने वाढणार आहे. पोहोचमार्गाची जागा खारभूमी असून ती अद्याप हस्तांतरीत झाली नसल्याने पुलाचे काम अपूर्ण आहे.

-----------------

## मौजे चंडीगाव (ता.डहाणू, जि.पालघर) येथील जमिनीच्या गैरव्यवहाराबाबत

**(३१) * १२३३०७ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चंडीगाव (ता.डहाणू, जि.पालघर) येथील गट/सर्वे नं ७२९ पैकी जागा महाराष्ट्र सॉल्ट ॲण्ड केमिकल वर्क्स यांना भाडेपटटा कराराने दिली असून भाडेपट्टा कराराची मुदत संपली असतांना अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे, मुख्यालय जव्हार यांनी दिनांक २५ ऑगस्ट, २००६ रोजी आदेशान्वये या करारास मुदतवाढ दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासकीय जागा भाडेपटटयाने दिल्यानंतर मुळ मालक व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या परवानगीशिवाय भागीदार म्हणून गावदप्तरी नांव नोंदणी करता येत नसतांनाही नियमाचे उल्लंघन करुन प्रदिप लक्ष्मण माच्छी यांनी तत्कालिन तलाठी, चंडीगाव व मंडळ अधिकारी, चिंचणी यांच्या संगनमताने बनावट कागदपत्रे व बेकायदेशीर भागीदारपत्र दाखल करुन ७/१२ मध्ये प्रदिप लक्ष्मण माच्छी यांचे नांव नोंदवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाची फसवणूक करुन बनावट कागदपत्रे व भागीदारपत्राच्या आधारे शासनाची फसवणूक करून ७/१२ उता-यात नांव नोंदणी करणा-या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द व इतर संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे चंडीगांव, ता.डहाणू येथील गट क्रमांक ७२९ (जुना स.नं.१२५) मधील २०० एकर जमीन मे.महाराष्ट्र सॉल्ट ॲण्ड केमिकल्स वर्क्स तर्फे अमिर साहेब महमद फक्की

यांना अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दिनांक १७.११.८१ च्या आदेशान्वये मिठागर या प्रायोजनासाठी २५ वर्षांच्या भाडेपट्टयाने देण्यात आली होती. सदर भाडेपट्टयास अप्पर जिल्हाधिकारी, जव्हार यांचे दिनांक २५.०८.२००६ च्या आदेशान्वये २५ वर्षांकरिता दिनांक ३१.०८.२०३१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदर कंपनीने उक्त मिळकतीत श्री.प्रदिप लक्ष्मण माच्छी यांना सहभागीदारी करार झालेला असल्याने याबाबतची नोंद गा.न.नं ७/१२ सदरी करणेबाबत तहसिलदार, डहाणू यांना दिनांक ०६.०२.२००७ च्या पत्रान्वये विनंती केली होती. तहसिलदार, डहाणू यांनी दिनांक ११.०४.२००७ च्या पत्रान्वये तलाठी सजा बाडापोखरण यांना आवश्यक नोंद घेणेबाबत कळविले त्यानुसार तलाठी सजा बाडापोखरण यांनी सहभागीदारी कराराबाबतची नोंद गा.नं.नं ७/१२ मध्ये फेरफार क्र.२९५ दिनांक १२.०४.२००७ अन्वये घेण्यात आली. मात्र सदरची नोंद घेतेवेळी वरिष्ठ कार्यालयाची कोणतीही परवानगी घेतल्याचे दिसून येत नसल्याने याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांनी उपविभागीय अधिकारी, डहाणू यांना सूचना दिलेल्या आहेत.

तसेच उक्त भाडेपट्टयाच्या जमिनीबाबत शासनाची पूर्वपरवानगी न घेता सदर कंपनीने परस्पर सहभागीदारी करार केला असल्याने शर्तभंग झाल्याने उपविभागीयअधिकारी, डहाणू यांनी दिनांक भाडेपट्टेदार यांना १८.०६.२०१८ अन्वये नोटीस बजाविली असून पुढील सुनावणी दिनांक ११.०७.२०१८ रोजी ठेवण्यात आली आहे. सुनावणी अंती पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## साखरपा ते दाभोळे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) या रस्त्यावरील पुलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३२) * १२२६०१ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरपा ते दाभोळे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) या रस्त्यावरील तीन पुलांची दुरवस्था झाली असून पुलाचे संरक्षक कठडे तुटल्यामुळे पुलावरून प्रवास करणे धोकादायक होऊन अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावरील पुलांसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर मार्गावरील आणखी किती पुलांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले व त्यानुसार या पुलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

रत्नागिरी-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ साखरपा ते दाभोळ या लांबीत तीन पूलाचे कठडे काही ठिकाणी वाहनांच्या धडकेने तुटलेले आहेत.
(२) व (३) सद्यस्थितीत पूलांच्या तुटलेल्या कठडयांच्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना म्हणून रेलिंग, डेलीनेटर्स व माहिति फलक अशा दुरुस्ती करण्यात आलेल्या आहेत. सन २०१८-१९ च्या देखभाल व दुरुस्ती अनुदानातून उपरोक्त लांबीतील पुलांची कायम स्वरुपी दुरुस्तीचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयात पावसामुळे केळी पिकाचे झालेले नुकसान

**(३३) * १२३८४२ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयामध्ये विशेषतः रावेर व यावल तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या केळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नुकसान झालेल्या केळीच्या पिकांची पाहणी शासनाने केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त केळी बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.
(३) प्रश्न भाग-१ मध्ये नमूद घटनेमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या केळींच्या पिकांच्या नुकसानीचे संयुक्त पंचनामे महसूल विभाग, जिल्हा परिषद व कृषी विभागामार्फत करण्यात येत असून, सदर संयुक्त पंचनामे प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगांव (ता.लोहा, जि.नांदेड) ते बनवस (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३४) * ११७५१७ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (ता.लोहा, जि.नांदेड) ते बनवस (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याची दूरवस्था झाली असुन रस्त्यावर अनेक खड्डे पडल्यामुळे नागरिक तसेच प्रवाशांना रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आपेगाव-कुरणपिंपरी-पाथरवाला चौक (ता.गेवराई, जि.बीड) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(३५) * १२१४८६ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आपेगाव-कुरणपिंपरी-पाथरवाला चौक (ता.गेवराई, जि.बीड) या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने स्थानिक नागरीकांमध्ये प्रचंड प्रमाणावर असंतोष निर्माण झाला असुन या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्याकडे वारंवार लेखी स्वरुपात दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारसह संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे अशा स्वरूपाची तक्रार आढळून येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मे.स्वाल कार्पोरेशन लि. ने मे.बालाजी एंटरप्रायजेस (जि.अकोला) येथे रासायनिक खतांचा अवैध साठा केल्याबाबत

**(३६) * १२११४६ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला औद्योगिक वसाहतीतील कुंभारीरोड (जि.अकोला) वरील मे.स्वाल कार्पोरेशन लि. द्वारा मे.बालाजी एंटरप्रायजेस या गोदामामध्ये लाखो रूपये किंमतीचा रासायनिक खतांचा नियमबाहयरित्या करण्यात आलेला साठा माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान जप्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर कंपनी विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय, मे. स्वाल कार्पोरेशन लि. द्वारा मे. बालाजी एंटरप्राईजेस, कुंभारी रोड, लोकमत प्रेस जवळ, कुंभारी, अकोला येथे सुमारे रु. १५.३१ लाख रकमेच्या रासायनिक खतांचा नियमबाहय साठा करण्यात आल्याचे दि. २१ मार्च, २०१८ रोजी निदर्शनास आले.

सदर साठा जप्त करण्यात आलेला आहे.

(३) खत नियंत्रण आदेश, १९८५ चे खंड ७ नुसार परवान्यामध्ये साठवणूक गोदामाचा समावेश नसताना खताची साठवणूक करणे, तसेच खंड ८ (२) नुसार परवाना नसलेल्या साठवणूक गोदामामधून विक्री करणे, तसेच, जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ च्या कलम ३ व ५ चे उल्लंघन केलेले असल्याने आढळून आल्याने कंपनीस विक्रीबंद आदेश देवून खुलासा मागविण्यात आलेला होता. कंपनीकडून कोणताही खुलासा प्राप्त न झाल्याने विक्रीबंद केलेला १७१५३ कि.ग्रॅ./ लि. वजनाचा रु.१५.३१ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजावली व वाघराळपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील वन व शासकीय जमिनींवर बेकायदा बांधकामे केल्याबाबत

**(३७) * ११६९६१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजावली व वाघराळपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील वन व शासकीय जमिनींवर बेकायदा बांधकामे करून विकासक त्यातील सदनिका व इतर बांधकामे विक्री करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार उक्त बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) मौजे राजावली येथील वन सर्व्हे क्रमांक १३१ (नविन १४३) मधील वनक्षेत्रावर अतिक्रमण करुन बेकायदा बांधकामे केल्याचे निदर्शनास येताच अतिक्रमण निष्कासनाची मोहिम दिनांक १९.२.२०१८ रोजी आयोजित करुन २२ निवासी घरे, १२ वाणिज्य गाळे व ५४ दगडी बांधकाम पाया असे अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेले आहे.

तसेच दिनांक १३.४.२०१८ रोजी वन विभागाने पोलीस, महसूल विभाग व वसई-विरार महानगरपालिका यांच्याव्दारे संयुक्तरित्या अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करुन ३.३६० हे. इतकी वनजमिन अतिक्रमण मुक्त करण्यात आली आहे.

वन विभागाव्दारे उर्वरित क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्याकरिता दिनांक १५.३.२०१८, दिनांक२३.३.२०१८ व दिनांक ३.४.२०१८ ते ५.४.२०१८ रोजी अतिक्रमण निष्कासनाची मोहिम आयोजित करण्यात आली होती. सदर अतिक्रमणास जबाबदार असणाऱ्या अतिक्रमण धारकांविरुद्ध स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदित्य श्री.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद या कंपनीने परवानगीपेक्षा अधिक उत्खनन केल्याबाबत

**(३८) * ११८६४६ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.राजना (ता.बसमत, जि.हिंगोली) येथील गट क्रमांक ११५ मध्ये आदित्य श्री.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद या कंपनीने १००० ब्रास मुरुम उत्खनन करण्याची परवानगी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मिळविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी उक्त ठिकाणी परवानगी मिळाल्यापेक्षा अधिक ब्रास मुरुम उत्खनन करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त कंपनीचा मुरुम उत्खननाचा परवाना रद्द करुन कंपनी विरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली आहे.

(३) व (४) तहसीलदार, बसमत यांनी कारणे दाखवा नोटीस बजावून संबंधित कंत्राटदाराने केलेला खुलासा मान्य केला आहे. तथापि, संबंधित कंत्राटदार यांचा खुलासा कोणत्या बाबींवर समर्थनीय आहे, याबाबत तहसीलदार, बसमत यांना जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. संबंधित कंत्राटदाराने परवानगीपेक्षा जास्तीचे गौण खनिजाचे उत्खनन केल्याच्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रस्त्यांच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(३९) * ११७०८१ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्यातील ९००० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या कामासाठी १ कोटी रुपये प्रती कि.मी. दराने रस्त्याचे अंदाजपत्रक बनविण्याऐवजी प्रती कि.मी. २.५ कोटी रुपये दराने अंदाजपत्रक बनविले असून रुपये १० हजार कोटीच्या कामासाठी २३ हजार कोटी रुपयांची निविदा काढून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे एका कंत्राटदारांने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील ११९ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या कामाचा यात समावेश असून यासाठी १३ हजार कोटी रुपये अतिरिक्त खर्च दाखविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर कामात गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) गैरव्यवहार झाला हे खरे नाही. तथापि अशा आशयाची बातमी दिनांक १ व २ एप्रिल, २०१८ च्या दैनिकामध्ये छापून आली होती.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या गोठ्यांना आग लागून झालेले नुकसान

**(४०) * ११९२८५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील नळकुंड गावालगतच्या तीन गाई-गुरांच्या गोठयांना तसेच देऊळघाट येथे दोन गोठयांना माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत कडबा, कुटार व इतर साहित्यांचे जळून नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाने या नुकसानाची पहाणी करुन पिडीत शेतकऱ्यांना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार मदत अनुज्ञेय नसल्याने बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर परिवहन कार्यालयांतर्गत ऑनलाईन परीक्षेत झालेला गैरव्यवहार

**(४१) * १२२१४१ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर परिवहन कार्यालय अंतर्गत ऑनलाइन परीक्षेत गैरव्यवहार करून एका महिन्यात सात हजार शिकावू वाहन परवाने वाटप केल्याचे दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याबाबत राजकीय पक्षाचे कार्यकर्ते यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निवदेन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) या प्रकरणी वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिद्ध झाली आहे.
(२) होय.
(३) यासंदर्भात संबंधित सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक यांना निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच प्रकरणाची अधिक चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काटेवाडी (तारळे) (ता.पाटण, जि.सातारा) या गावाच्या हद्दीतील खडीक्रशर बंद करण्याबाबत

**(४२) * ११९८१६ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काटेवाडी (तारळे) (ता.पाटण, जि.सातारा) या गावाच्या हद्दीतील डोंगरात स्थानिक नागरिकांनी खडीक्रशर सुरु केले असून खडीक्रशर सुरु करणेकरीता डोंगरातील केवळ १० गुंठ्टे जागेचे खरेदीपत्र केले असताना या खडीक्रशरचा बेकायदेशीर विस्तार एक एकर क्षेत्रात केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या खडीक्रशरच्या वरच्या बाजूस प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत कोंजवडे ते बेंदवाडी हा रस्ता असून खडीक्रशर असेच सुरु राहिल्यास हा रस्ता खचण्याची भिती बेंदवाडी ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत असल्याने सदरचे खडीक्रशर तातडीने बंद करण्याबाबतची मागणी बेंदवाडी ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदर खडीक्रशर बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) ग्रामस्थ बेंदवाडी यांनी दि.६/२/२०१६ रोजी मंडळ अधिकारी, तारळे यांचेसमोर दिलेल्या जबाबामध्ये मौजे काटेवाडी, ता.पाटण येथील स.नं.२२/४ मधील खाण बंद करण्याची मागणी केली होती.
(३) व (४) कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, सातारा यांनी सदर खाणीचे उत्खनन रस्त्याचे बाजूने सुरु ठेवल्यास भविष्यात रस्ता खचण्याची शक्यता वर्तविल्यामुळे अपर जिल्हाधिकारी, सातारा यांनी दि.२९/२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये सदर खाणीतून उत्खनन बंद करण्याचे आदेश पारित केले असून सद्यस्थितीत सदर खाणीतून उत्खनन बंद आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरूर-सातारा महामार्गावरील मौजे दापोडी व मौजे बोरीपार्धी (ता.दौंड, जि.पुणे) येथील पुलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४३) * १२३०६२ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरूर-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील मौजे दापोडी व मौजे बोरीपार्धी (ता.दौंड, जि.पुणे) येथील पुलांची दुरवस्था झाली असून या पुलांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी संबंधितांकडे अनेक वेळा केली असल्याचे दिनांक २२ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलांची दुरुस्ती करण्याऐवजी त्या ठिकणी मोकळे बॅरल सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेवल्यामुळे वाहतूक कोंडी होऊन अनेक अपघात घडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त महामार्गावरील दापोडी व बोरीपार्धी येथील पुलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकीत शिरुर सुपा सातारा रस्ता रा.मा.११८ असा आहे. मौजे दापोडी व मौजे बोरीपार्धी येथील दोन्ही पुल अरुंद असल्याने वाहतुक कोंडी होते. या दोन्ही पुलांवरील वाहनांचा वेग नियंत्रित ठेवून अपघात रोखण्याच्या हेतूने मोकळे बॅरल पुलाच्या जोड रस्त्यावर ठेवण्यात आले आहेत.
(३) व (४) सदर दोन्ही पुलांच्या तुटलेल्या कठडयाच्या जागी लोखंडी रेलिंग बसवण्यात आले आहेत.

हा रस्ता तत्वत: राष्ट्रीय महामार्ग घोषित झाला असून रस्त्याच्या प्रकल्प अहवालाचे काम राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीत आहे.

सद्य:स्थितीत दोन्ही पुल सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद-अजिंठा (जि.औरंगाबाद) या रस्त्याच्या कामाबाबत

**(४४) * १२२०५७ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद-अजिंठा (जि.औरंगाबाद) या चौपदरी रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामात माती मिश्रीत मुरुमाचा वापर केल्याबाबतची तक्रार माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असून कामाची पाहणी करुन तहसीलदारांना पंचनामा करण्याची सूचना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याच्या कामात माती मिश्रीत मुरुमाचा वापर करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशा आशयाचे तक्रारीबाबत अद्याप कोणताही पत्रव्यवहार जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेला नाही.

औरंगाबाद-अजिंठा, औरंगाबाद-जळगांव रा.म.क्र.७५३ फ चा भाग असून सदर रस्त्याचे ईपीसी अंतर्गत रुंदीकरण व मजबूतीकरणाचे काम प्रगतीत आहे. सदर कामावर ॲथॉरिटी अभियंत्याची नेमणूक असून त्यांचे प्रभावी नियंत्रण असते. सदरील लांबीत भरावासाठी वापरण्यात येत असलेली माती IS-२७२०-part-४० च्या मानकाप्रमाणे आहे. तसेच वापरण्यात येणा-या साहित्याची बांधकामापूर्वी व दरम्यान चाचण्या प्रयोगशाळेमध्ये घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य रस्ते विकास महामंडळाने खालापूर (जि.रायगड) येथे भूखंड वाटपात अनियमितता केल्याबाबत

**(४५) * ११६९३७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खालापूर (जि.रायगड) येथील फूड मॉल, ट्रक टर्मिनल साठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने केलेल्या भूखंड वाटपात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनियमीततेमुळे शासनाच्या २००० कोटी रुपयांच्या महसुलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भूखंड वाटपाबाबतच्या अनियमितता प्रकरणी शासनाने चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(५) असल्यास, त्यानुषंगाने ट्रक टर्मिनल व मॉलसाठी देण्यात आलेली जमीन काढून घेण्यासह या गैरव्यवहारातील संबंधीतांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. तथापि, ट्रक टर्मिनल २ च्या भूखंडासाठी ९.५० हेक्टर क्षेत्राकरीता ३० वर्षाच्या भाडेपट्टयासाठी रु.१५.५६५ कोटी महामंडळास प्राप्त झाले असून रु.४०.०० कोटी रुपयांचे ट्रक टर्मिनल चे बांधकाम सवलत धारकाने करावयाचे असून तयार झालेल्या सुविधेतून महामंडळास पार्किंग चार्जेस पोटी ५०% वाटा मिळणार आहे व ट्रक चालकांसाठी सुविधा सुध्दा मिळणार आहेत.
(३) या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन व वित्त), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास यांच्या अध्यक्षतेखाली दि.२३.०२.२०१७ रोजी चौकशी समिती नेमण्यात आली आहे.
(४) व (५) या संदर्भात चौकशी समितीचा अहवाल महामंडळास प्राप्त झाला असून सदर अहवाल संचालक मंडळाच्या विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान झाराप-भावई मंदिर येथे बॉक्सवेल व झारापतिठा येथे ओव्हरब्रीज बांधण्याबाबत

**(४६) * ११८०२२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ**

**(कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरण करताना झाराप-भावई मंदिर येथे बॉक्सवेल व झारापतिठा येथे ओव्हरब्रीज बांधण्याच्या मागणीकरिता संबंधित ग्रामस्थांनी दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम बंद केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी जिल्ह्याच्या हद्दीत २७ अपघातग्रस्त ठिकाणे (ब्लॅक स्पॉट) निश्चित करण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार झाराप-भावई मंदिर येथे बॉक्सवेल व झारापतिठा येथे ओव्हरब्रीज बांधण्याबाबत व रत्नागिरी जिल्ह्याच्या हद्दीतील २७ अपघातग्रस्त ठिकाणावर सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे सुचनेनुसार मुंबई-गोवा चौपदरीकरण भागात पावसाळयापूर्वी करावयाच्या उपाययोजना साठी स्थानिक प्रशासन, संबंधित कंत्राटदार, कन्सल्टंट व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे

अधिकारी यांनी एकत्रित पहाणी करुन १०४ ठिकाणी रस्ते सुरक्षेच्या उपाययोजना सुचविल्या असून रस्ते सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

केंद्रीय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या वतीने राज्य शासनामार्फत मुंबई-गोवा रा.म.क्र.६६ अंतर्गत इंदापूर ते झाराप कि.मी.८४/०० ते ३६६/०० ह्या एकूण २८२ कि.मी.लांबीतील कशेडी घाटातील १३ किमी लांबी वगळता चौपदरीकरणाचे काम प्रगतीत आहे. झाराप भावई मंदिराजवळ २५० मीटर अंतरावर एक भुयारी मार्ग व त्याअनुषंगाने झाराप-भावई मंदिरापर्यंत सेवा रस्ते प्रस्तावित असून झाराप- भावई मंदिर येथे जनतेची गैरसोय होणार नाही. तसेच झारापतिठा येथे समपातळीत रस्ता ओलांडण्याचा चौक प्रस्तावित असून सदर रस्ता बंद होणार नाही. परंतु गावक-यांच्या मागणीनुसार झाराप भावई मंदिराजवळ बॉक्सवेलची व झारापतिठाला फ्लायओव्हरची तरतूद करणेबाबतची शक्याशक्यता तपासण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील १०३ गावांना दरड कोसळण्याचा धोका असल्याबाबत

**(४७) * १२२९२२ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील दासगाव, जुई, रोहण, कोंडिवले या गावांत माहे जुलै, २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे दरडी कोसळून शंभरहून अधिक जणांचा बळी गेल्याच्या घटनेला १३ वर्षे होवूनही महाड तालुक्यातील अनेक गावांना तसेच चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील १२ गावांतील अनेक वाड्यांना पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूवैज्ञानिक आणि भूगर्भ शास्त्रज्ञानी केलेल्या सर्वेक्षणात राज्यातील रायगड जिल्हयातील १०३ गावांना दरडी कोसळण्याचा धोका असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला असून त्यामध्ये महाडमधील ४९ गावे, पोलादपूरमधील १५ गावे, रोहा तालुक्यातील १३, म्हसळा तालुक्यातील ६, माणगावमधील ५, पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड मधील प्रत्येकी ३, श्रीवर्धनमधील २ तर तळा तालुक्यातील एका गावाचा समावेश असल्याचे दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावातील २० गावे धोकादायक स्थितीत असून महाड तालुक्यातील लोअर तुडील, टोळ खुर्द बौध्दवाडी, मोरेवाडी शिंगरकोंड, पातेरेवाडी आंबिवली बुद्रुक आणि कोंडिवले ही पाच गावे अतिधोकादायक अवस्थेत असल्याचा अहवाल देण्यात आलेला असून येथील रहिवाशांना सुरक्षितस्थळी स्थलांतरण करण्याचा सल्ला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दरडग्रस्त गावांमधील ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

भारतीय भुवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने रायगड जिल्हयातील गावांची भूवैज्ञानिक मानकांच्या आधारे दरड कोसळण्याच्या प्रवणतेनुसार (vulnerableility) वर्ग - I, II, III अशी वर्गवारी केली आहे. त्यानुसार महाड तालुकयातील वर्ग I मध्ये लोअर तुडील, टोळ खुर्द बौध्दवाडी, मोरेवाडी शिंगरकोंड, पातेरेवाडी आंबिवली बुद्रुक आणि कोंडिवले ही पाच गावे अतिउच्च संभाव्य दरड प्रवण असल्याचा अहवाल देण्यात आलेला आहे. या गावांची अतिउच्च वर्गवारीतील संभाव्य दरडप्रवणता विचारात घेता, पावसाळयाच्या

कालावधीत जागरुक राहण्याचा सल्ला अहवालात देण्यात आलेला आहे. त्यामुळे अतिवृष्टी होत असल्यास नागरिकांना वेळीच सुरक्षित स्थळी तात्पुरते स्थलांतर करण्याच्या सूचना जिल्हास्तरावरुन देण्यात येत असुन त्यांच्या निवासाकरिता पर्यायी व्यवस्था तयार ठेवण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे दरडप्रवणतेच्या वर्गवारीप्रमाणे संभाव्य दरडप्रवण गावात विविध रचनात्मक व अरचनात्मक उपाययोजना राबविण्यास शिफारस केलेली आहे.

(४) चिपळूण तालुक्यातील संभाव्य दरडग्रस्त १२ गावांपैकी मौजे तिवरे कुंभारवाडी, आकले येथील कांगणेवाडी व मुंढे तर्फे चिपळूण येथील खेतलेवाडी व गोवळकोट येथील कदम बौध्दवाडी यांचे पुनर्वसन करण्याचे काम चालू आहे. उर्वरीत गावातील वाडया सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पाहणी करण्यात आले असून त्यांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत होणेस कळविणेत आले आहे. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने त्यांच्या अहवालात रायगड जिल्हयातील २० गावे (वर्ग १ ची ९ वर्ग २ ची ११) अतिउच्च संभाव्य दरडप्रवण व इतर ८३ गावांमधील दरडप्रवणतेविरुध्द करावयाच्या कार्यवाहीसंबंधात अरचनात्मक व रचनात्मक उपाययोजना करण्याची शिफारस केलेली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी रायगड यांनी त्यांच्या दि.३१.३.१८ च्या पत्रान्वये अहवालातील नमूद शिफारशींनुसार उचित कार्यवाही करण्यासाठी जिल्हा परिषद अलीबाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (अलिबाग, महाड व पनेवल), नगर रचना विभाग रायगड-अलिबाग, सर्व उपविभागीय अधिकारी, मुख्य अधिकारी नगरपरिषद सर्व, अप्पर जिल्हाधिकारी रायगड, जिल्हा खनिकर्म अधिकारी रायगड-अलिबाग यांना कळविलेले आहे. दि.१७.५.१८ ते २१.५.१८ या कालावधीमध्ये तालुकास्तरावर दरडप्रवण गावातील सरपंच, पोलीस पाटील, तलाठी, प्रतिष्ठीत नागरीक, ग्रामसेवक यांच्या उपस्थितीमध्ये जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातुन दरड कोसळण्याबाबत सविस्तर माहिती प्रसारित करण्यात आली आहे. पाउस मोजण्यासाठी प्रत्येक महसुल मंडळावर पर्जन्यमापक यंत्र बसविण्यात आले असुन अतिवृष्टी होत असल्यास नागरिकांना वेळीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. रचनात्मक शिफारशींमध्ये

१. दरडप्रवण गावांमधील डोंगर उताराकडील बाजूस डोंगरकापण्याच्या कामास प्रतिबंध करणे.

२. पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पाणी वाहुन नेण्याची व्यवस्था निर्माण करणे

३. खंदक उभारणी करणे

४. पावसाठी हंगामामध्ये जमीनीस पडणा-या भेगा, अस्थिर भूभाग यासारख्या भुर्गभ हालचालींवर लक्ष ठेवुन जनजागृती करणे

५. डोंगरउतारावरील मोठे दगड हटविणे

६. डोंगरातील दरडप्रवण भागातील नागरिकांचे कायमस्वरुपी स्थलांतर करणे, या उपाय योजनांचा समावेश आहे. तांत्रिक अहवालातील संभाव्य दरडप्रवणतेच्या गावांची वर्गवारी व तीव्रता विचारात घेवून योग्य त्या उपाययोजना राबविण्याची दक्षता स्थानिक प्रशासनाकडून घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेवणगांव (ता.खानापूर, जि.सांगली) घाटात एस.टी. बस व डंपरचा झालेला अपघात

**(४८) * १२३८७० श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवणगांव (ता.खानापूर, जि.सांगली) घाटात एस.टी.बस आणि डंपर यांच्यामध्ये झालेल्या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू व चार जण गंभीर जखमी झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातातील डंपर चालकाविरुध्द विटा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अपघात होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना तसेच जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

दि.२४.०४.२०१८ रोजी झालेल्या सदर अपघातामध्ये राज्य परिवहन बसमधील ०३ प्रवाशांचा मृत्यू होऊन ०२ प्रवाशी व ०१ डंपर चालक असे एकूण ०३ व्यक्ती जखमी झालेले आहेत.

(२) व (३) सदर अपघातास डंपर चालक जबाबदार असल्याने विटा पोलिस स्टेशन येथे डंपर चालकाविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे.

(४) सदर अपघातात राज्य परिवहन बसमधील तीन प्रवाशांचा मृत्यू झालेला असून, मयतांच्या वारसांना आर्थिक तात्कालिक मदत प्रत्येकी रु.१०,०००/- देण्यात आलेली आहे. तसेच, अपघात नुकसान भरपाई देण्यास्तव 'पी' फॉर्म देण्यात आलेले आहेत. जखमी प्रवाशांना आर्थिक तात्कालिक मदत देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागोठणे (जि.रायगड) येथे खारे पाणी शिरून शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक होत असल्याबाबत

**(४९) * १२०३४८ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (जि.रायगड) येथील माचेला गावाच्या स.न. ९४ मधील नाल्यात जेएसडब्ल्यू कंपनीने पाईप टाकून पलिकडे जाण्यासाठी तयार केलेल्या मार्गामध्ये खाडीमधून दर उधाणाच्या भरतीला खारे पाणी शिरत असल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तहसिलदार नागोठणे, जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे ११ गावातील नागरिकांनी वारंवार लेखी तक्रारी करुनही अद्याप कोणतीही कारवाई संबंधित कंपनीवर केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन संबंधित कंपनीवर कारवाई करीत नसल्याने परिसरातील ११ गावातील नागरिकांनी खाडीतील भरतीच्या पाण्यात आत्महत्या करण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०१८ मध्ये जिल्हाधिकारी, रायगड यांना लेखी कळविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून खारे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात शिरू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत व संबंधित कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) ११ गावातील महिला व शेतकरी खाडीमध्ये बसून सत्याग्रह करणार असल्याबाबत दि.०९.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी पेण, उपविभाग, पेण यांचे कार्यालयांस लेखी कळविले आहे. सदरच्या पत्रात आत्महत्या करण्याबाबत नमूद केलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नावळे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्याच्या कामासाठी लागणाऱ्या गौण खनिजाचे अवैधरित्या उत्खनन केल्याबाबत

**(५०) * १२२६६१ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नावळे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्याच्या कामासाठी लागणाऱ्या गौण खनिजाचे शासनाची परवानगी न घेता अवैधरित्या उत्खनन केल्याच्या केलेल्या तक्रार प्रकरणी मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या अहवालाच्या आधारे तहसीलदार, वैभववाडी यांनी संबंधित ठेकेदार श्री.ए.पी. सावंत यांना ५० लक्ष रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर ठेकेदाराने दंडाची रक्कम भरली आहे काय,
(३) नसल्यास, संबंधित ठेकेदाराकडून सदर दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) ५६४.८५ ब्रास गौण खनिजाच्या अवैध उत्खननाप्रकरणी संबंधित कंत्राटदार श्री.ए.पी.सावंत यांस रु.५०,०९,७२९/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश दि.१४/३/२०१८ रोजी तहसीलदार, वैभववाडी यांनी पारित केले आहेत. संबंधित कसुरदार यांनी दंडाच्या रक्कमेचा भरणा केला नसल्याने सक्तीच्या उपाययोजनांचा अवलंब करुन वसुलीची कार्यवाही सुरु आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये संबंधित कसुरदाराने तहसीलदार, वैभववाडी यांच्या दि.१४/३/२०१८ च्या उक्त आदेशाविरुध्द उपविभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडे अपील दाखल केले असून सदर अपील प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) शहरातील राजानगर येथील जमिनीचे नियमबाह्यरीत्या खरेदी विक्रीचे व्यवहार केल्याबाबत

**(५१) * ११९३५१ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) शहरातील राजानगर येथील नविन अविभाज्य शर्तीची स.न २२५/२ ही जागा श्री.नारायणराव राजे बहादूर व अन्य व्यक्तींच्या नांवे असुन सदर जागा त्यांनी गत १०० वर्षापूर्वी ७०० गरीब

कुटुंबियांना नाममात्र भाडे दरावर दिली असुन तेथे सद्य:स्थितीत ३० ते ४० हजार नागरिकांचे वास्तव्य आहे, तसेच त्यांना महानगरपालिकेने सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागातील तलाठी, काही अधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, मालेगांव व काही लोकप्रतिनिधी यांनी अटी व शर्तीचा भंग करुन तेथील रहिवाशांना दमदाटी करून नियमबाह्यरीत्या सदर जागेच्या खरेदी विक्रीचे व्यवहार केले असल्याचे दिनांक २३ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार नियमबाह्यरीत्या सदर जागेच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करणाऱ्या संबंधित व्यक्ती तसेच अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) मालेगांव शहर, ता.मालेगांव, जि.नाशिक येथील राजानगर येथील स.नं.२२५/२ ही जागा नवीन अविभाज्य शर्तीची (पाटील इनाम) असून श्री.नारायण राजे बहाद्दूर व अन्य व्यक्तींच्या नावे आहे. मात्र सदर मिळकत सन १९३० ते आजपर्यंत गाननं ७/१२ व अधिकार अभिलेख पहाता भाडेकरारावर दिल्याबाबत कोणतीही नोंद आढळून येत नाही.

सदर मिळकतीत त्रयस्थ व्यक्तींनी अतिक्रमण करून घरांचे बांधकाम करून वस्ती निर्माण केलेली आहे. सदर ठिकाणी एकूण ३५३ झोपड्या असून मालेगांव महानगरपालिकेमार्फत तेथील जनतेला सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच सन १९८१-८२ पासून तत्कालीन नगरपालिकेमार्फत त्यांना घरपट्टी लावण्यात आलेली आहे.

(२) श्री. शिवदेवराव भगवंतराव राजेबहादुर व इतर यांनी दि. २८.०७.२०१७ रोजी अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांच्या कार्यालयाकडे सदर जागेच्या विक्री परवानगी करीता अर्ज सादर केला होता. मात्र सदर जमीन पाटील इनाम वर्ग ६ ब ची असल्याने शासन परिपत्रक दि.९ जुलै, २००२ च्या तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाहीस्तव सदर प्रकरण अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांच्या दि.६.०३.२०१८ च्या पत्रान्वये तहसिलदार, मालेगांव यांच्या कार्यालयाकडे

पाठविण्यात आले आहे. दरम्यान सह दुय्यम निबंधक वर्ग-२ मालेगांव यांच्याकडील दस्त क्र.१०७१/२०१८, दि.३.०३.२०१८ अन्वये सदर जागेचा विक्री व्यवहार झालेला आहे.

मात्र, महसूल विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी तेथील रहिवाशांना दमदाटी केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांच्या कार्यालयाच्या दि.२१.०५.२०१८ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांना सविस्तर चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांच्यामार्फत चौकशीचे कामकाज चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वावी (ता.सिन्नर, जि.नाशिक) ते शिर्डी (जि.अहमदनगर) दरम्यानच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(५२) * १२०६६० श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वावी (ता.सिन्नर, जि.नाशिक) ते शिर्डी (जि.अहमदनगर) दरम्यान बांधण्यात येत असलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी उक्त कामाची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन संबधित कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटीस अनुलक्षुन अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे मार्फत करण्यात आलेल्या तपासणीत काम निकषानुसार होत नसल्याचे आढळून आले आहे.

(३) संबंधीत कंत्राटदार व जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेविरूध्द नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंदगड (जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण रुग्णालयासमोरील वळण रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत

**(५३) * १२३०३९ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण रुग्णालयाजवळच्या रस्त्याचे डांबरीकरण करुन येथे वारंवार होणाऱ्या अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी वळण रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार चंदगड येथील ग्रामीण रुग्णालयाजवळच्या रस्त्याचे डांबरीकरण करून वळण रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

(२), (३) व (४) तात्पुरती उपाययोजना म्हणून ग्रामीण मार्ग क्र.९० व राज्यमार्ग क्र.२०१ वर गतिरोधक बसविण्यात आले आहेत. तसेच वळणावरील साईट व्हीजन क्लीअर होण्यासाठी ग्रामीण रुग्णालयाची संरक्षक भिंत काढून त्या ठिकाणी चेन लिंक फेन्सींग/ एम.एस.ग्रील फेन्सींग उभारण्याचे वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, चंदगड यांचेकडे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच राज्यमार्ग क्र.२०१ ची जंक्शन म्हणून सुधारणा करण्याबाबतचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात येईल.

-----------------

## भूगाव (ता.मुळशी, जि.पुणे) येथील रस्त्याची दुरुस्ती करून वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(५४) * ११९१६२ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-कोलाड मार्गावर भूगाव (ता.मुळशी, जि.पुणे) येथे अनेक लग्नकार्यालये असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे तसेच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे असून महामार्गाशेजारील सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने रस्त्यावरील खड्डे पाण्याने भरत असल्याने रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालक तसेच प्रवाशांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्याबाबतची मागणी प्रवाशी व नागरीकांनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करून रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकीत पौड मुळशी कोलाड रस्ता रा.मा.५ असून भूगाव येथे रस्त्यालगत अनेक मंगल कार्यालये आहेत. या रस्त्याच्या बाजुला आलेल्या घरातून व हॉटेलमधून सांडपाणी रस्यावर सोडल्याने वाहतूक कोंडी होते. रस्यावर सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर उपाययोजना करण्याबाबत ग्रामपंचायत भूगाव यांना विभागामार्फत कळविण्यात आले आहे. तसेच पौड पोलीस स्टेशन यांचेकडून भूगाव येथे वाहतूक कोंडी होत असल्याने नियमित पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येतो.
(३) व (४) सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ (F) असा घोषित झाला असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रस्ते सुधारणा कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत रस्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले असून रस्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कोकण विभागात कृषी सहायक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत झालेला गैरप्रकार

**(५५) * १२३५३७ श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण विभागात माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या कृषी सहायक पदाच्या भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असुन ज्यांनी परीक्षेतील गुणासंदर्भात तक्रारी केल्या त्यांना वाढीव गुण देण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षेत केवळ सिंधुदूर्ग जिल्ह्यातील चार उमेदवारांची निवड करण्यात आली असून या उमेदवारांना जालना येथील खाजगी कंपनीकडे पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनी या उमेदवारांना कामाचा अत्यल्प मोबदला देऊन शासनाची फसवणूक करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

कृषि विभागाच्या अखत्यारितील कोकण विभाग, ठाणे याचे अधिनस्त कृषि सहाय्यक संवर्गातील पेसा क्षेत्रातील ३४ व पेसा क्षेत्राबाहेरील १७६ अशा एकूण २१० रिक्त पदांसाठी दि.०४.०२.२०१८ रोजी जाहिरात विज्ञापित करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये दि.१३ व १४ मार्च, २०१८ रोजी ऑनलाईन परीक्षा महापरीक्षा कक्ष, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान विभाग) यांचेमार्फत घेण्यात आली होती. सदर परीक्षेचा महापरीक्षा कक्षाद्वारे जाहीर करण्यात आलेला निकाल कृषि विभागाच्या संकेतस्थळावर दि.१८ एप्रिल, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. भरती प्रक्रियेची संपूर्ण प्रक्रिया महापरीक्षा या त्रयस्थ यंत्रणेमार्फत राबविण्यात आलेली असल्याने उमेदवारांनी गुणांसंदर्भात तक्रारी केल्यानंतर त्यांना वाढीव गुण देण्याबाबतची कोणतीही कार्यवाही विभागाकडून करण्यात आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रस्तुतच्या भरती प्रक्रियेची केवळ गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे मूळ अर्ज क्र.६२७/२०१८ दाखल केलेला असून सदर अर्जावर दि.८.५.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान मा.न्यायाधिकरणाने पुढील सुनावणीपर्यंत संपूर्ण भरती प्रक्रियेस स्थगिती दिलेली आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी दि.५.७.२०१८ रोजी आहे. ही बाब लक्षात घेता सदर परिक्षेत केवळ सिंधुदुर्ग जिल्हयातील चार उमेदवारांची

निवड करण्यात आली असून या उमेदवारांना जालना येथे खाजगी कंपनीकडे पाठवून अत्यल्प मोबदला देण्यात येत असल्याबाबत कोणतेही तथ्य नसल्याचे दिसून येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उकळी पेन (ता.जि.वाशिम) येथील राजगुरु विद्‌यालय ते वखार महामंडळ या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(५६) * १२१५२० श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उकळी पेन (ता.जि.वाशिम) येथील राजगुरु विद्‌यालय ते वखार महामंडळ हा डांबरी रस्ता मोठया प्रमाणात उखडला असून रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने वाहतुकीस धोकादायक झाला असल्याने अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाल्याचे दिनांक ११ मे, २०१८ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उकळी पेन ते वखार महामंडळ, हायवे पर्यंतच्या रस्त्याचे पॅचेस न भरता मजबूत डांबरीकरण करण्याची मागणी येथील जनतेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी चौकशी करून तातडीने कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारची लेखी मागणी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून प्रश्नांकित राष्ट्रीय महामार्ग ते धुमका हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ९९ असून या रस्त्याची एकूण लांबी २.५० कि.मी. आहे. रस्ता डांबरी पृष्ठभागाचा असून जास्त प्रमाणात वाहतूक वर्दळ असल्याने खड्डे पडले आहेत.

सदर रस्त्याचे मजबुतीकरण व दुरुस्ती करणे आवश्यक असून सन २०१८-१९ मध्ये रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सदर रस्त्याचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माले (ता.मुळशी, जि.पुणे) या गावात मातीचा बंधारा कोसळून झालेले नुकसान

**(५७) * ११६७०२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माले (ता.मुळशी, जि.पुणे) या गावातील पर्यावरण संवेदनशील क्षेत्र असलेल्या गट क्र.२८१ मध्ये खासगी बांधकाम व्यावसायिकाने अवैधरीत्या प्लॉट विक्री सुरु केली असून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी मातीचा बंधारा बांधून जास्तीचे पाणी वाहून जाण्यासाठी पाईप लाईन न टाकता बांध कोरल्याने बंधारा फुटून शेतकऱ्यांचे भातपीक, बांध मिळून वीस एकर क्षेत्राचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच ठिकाणी जिल्हा परिषदेची शाळा असून मुले शाळेत असतांना ही दुर्घटना घडली असती तर विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असता तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी या बंधाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यामुळेच सदर घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर बांधकाम व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) माले (ता.मुळशी, जि.पुणे) येथील जमीन गट क्र. २८१ मध्ये अवैधरित्या प्लॉट विक्री सुरु केली असल्याची बाब खरी नाही. मात्र गट क्र. २८१ मध्ये सन १९९० पासून अस्तित्वात असलेला सन २०११ मध्ये संबंधित जमीन मालक यांनी दुरुस्त करुन आकार वाढविलेला बंधारा दिनांक २५.७.२०१७ रोजी रात्री ११.०० च्या दरम्यान फुटून त्यातील पाणी व माती उतारावरील नैसर्गिक व ओहळीमधुन वाहून मौजे माले, तालुका मुळशी येथील शेतकऱ्यांचे भात पिकांचे व बांधाचे नुकसान झाले आहे, ही बाब खरी आहे.

(२) सदर बंधारा हा नैसर्गिकरित्या मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या पावसामुळे भरून फुटला असले कारणाने संबंधित अधिकारी यांचे याकडे दुर्लक्ष झाले असल्याची बाब खरी नाही.

(३) व (४) मौजे माले, ता.मुळशी, जि.पुणे येथील झालेल्या भात पिकाचे नुकसानीबाबत संबंधित शेतकऱ्यांना जमीन मालकाकडून रुपये ४,९३,२५० इतकी नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

संबंधित व्यक्ती विरुध्द कोणत्याही शेतकऱ्याने तक्रार केली नसल्याने व नुकसान भरपाईची रक्कम दिली असल्याने संबंधित व्यक्तीविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्ली (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) खाडी परिसरातुन होणा-या अवजड वाळू वाहतुकीमुळे काळसे-कुडाळ या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(५८) * ११८५८३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्ली (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) खाडी परिसरातुन होणा-या अवजड वाळू वाहतुकीमुळे काळसे-कुडाळ या रस्त्याची दुरवस्था होऊन रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असून डंपर चालकांकडून नागरीकांना त्रास दिला जात असल्यामुळे नागरीकांनी प्रांताधिकारी, तहसीलदार, मालवण तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदर खाडी परिसरातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करून काळसे-कुडाळ या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) काळसे, ता.मालवण येथील मालवण काळसे ते कुडाळ मुख्य रस्त्यावरुन अवजड गौण खनिज वाहतूक बंद करणेबाबत सरपंच, ग्रामपंचायत काळसे यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग, तहसिलदार, मालवण यांना दि.२७/०३/२०१८ रोजी निवेदन दिले आहे.

(२) व (३) दिनांक ०५/०४/२०१८ रोजी तहसिलदार, मालवण, पोलीस निरीक्षक, मालवण व जिल्हा खनिकर्म अधिकारी, सिंधुदूर्ग यांनी सदर रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली असता, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर रस्ता दि.९ एप्रिल, २०१८ ते २० एप्रिल, २०१८ या कालावधीत वाळू वाहतूक करणाऱ्या परवानाधारकांसाठी बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मालवण तालुक्यात माहे एप्रिल,२०१७ ते मार्च,२०१८ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध वाहतूकीप्रकरणी ३३ वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करुन रु.१३,५०,६९८/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरज-घोसाळकरवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे मातीचा अनधिकृत साठा केल्याबाबत

**(५९) * ११७४२३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरज-घोसाळकरवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे मातीचा अनधिकृत साठा केल्याने संबंधित जागा मालकावर दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी शेकडो ब्रास मातीसाठा असताना केवळ ४५ ब्रास मातीचा साठा दर्शवून केवळ १ लाखांचा दंड आकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार अनधिकृत माती साठा करणाऱ्यांवर व कमी माती साठा दर्शवून शासनाचे नुकसान करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) बोरज-घोसाळकरवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे जमीन मालकाने विनापरवानगी माती उत्खनन केल्याने दि.२२/५/२०१८ रोजी तहसीलदार, खेड यांनी संबंधिताविरुध्द रु.१,०३,९५०/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश पारित केले आहेत. सदरचे अवैध उत्खनन ४५ ब्रास असल्याचे उपविभागीय अधिकारी, खेड यांनी केलेल्या पाहणीत स्पष्ट झाले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दुधना नदीच्या पात्रातील वाळू उपशामुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत

**(६०) * १२३५१० डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारला, एकरुखा, कुंभारी बाजार, डिग्रस, नांदगाव, मांडवा (ता.जि.परभणी) या गावांच्या परिसरात निम्न दुधना प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे काम सुरु असून या बांधकामासाठी लागणारी वाळू दुधना नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणात उपसा केली जात असल्यामुळे दुधना नदीचे अस्तित्व धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार वाळू उपशामुळे दुधना नदीला धोका न पोहोचण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) निम्न दुधना प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेअंतर्गत प्राधान्यक्रमाने समावेश करण्यात आला आहे. सदर प्रकल्प माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण करणे नियोजीत असून सदर प्रकल्पाच्या कामासाठी वाळू उपलब्ध होत नसल्याने दुधना नदीवरील जे वाळूघाट लिलावात गेलेले नाहीत असे १० वाळूघाट आरक्षीत करण्यात आले असून त्यासाठी आवश्यक स्वामित्व शुल्काची रक्कम जलसंपदा विभागामार्फत अदा करण्यात आली आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शरणापूर (जि.औरंगाबाद) परिसरात बनावट कालबाह्य बियाणे, खते व कीटकनाशकांचा साठा जप्त केल्याबाबत

**(६१) * १२३४०२ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील शरणापूर परिसरात दिनांक ३० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास सव्वा कोटी रुपयांचा बनावट व कालबाह्य कीटक नाशक, खतांचा व बियाणांचा साठा जप्त करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालबाह्य झालेल्या कीटकनाशक, खत व बियाण्यांची रिपॅकिंग करून विक्री करण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू बियाणे, खते, कीटकनाशके यांचे उत्पादन तमिळनाडूतील इस्वी अग्रो केमिकल प्रा.लि. या कंपनीने केले असून त्याचे पॅकिंग शरणापुर शिवारात करण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) औरंगाबाद जिल्ह्यातील शरणापूर परिसरात दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी सुमारे रूपये १.२२ कोटी रकमेचा अप्रमाणित व कालबाह्य झालेला किटकनाशक व खतांचा साठा आढळून आलेला असून तो जप्त करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी बियाणांचा साठा आढळून आलेला नाही.
(२) व (३) सदर किटकनाशक हे इस्वी अॅग्रो केमिकल्स प्रा.लि. तामिळनाडू या कंपनीने व खते तापी फर्टीलायझर्स प्रा.लि. औरंगाबाद या कंपनीने उत्पादित केलेली होती. सदर किटकनाशकांची रिपॅकींग शरणापूर शिवारात करण्यात येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(४) सदर प्रकरणी चौकशी करून आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद क्रमांक ५१/२०१८ अन्वये भारतीय दंड संहिता व अन्य कायद्यांखाली गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मानखुर्द येथील चिल्ड्रेन्स एंड सोसायटीच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण

**(६२) * ११७७७२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण),**

**प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द येथील चिल्ड्रेन्स एंड सोसायटीला सन १९४० मध्ये १४० एकर जमीन दिली असून त्यातील १०० एकर जमीन सद्यस्थितीत सोसायटीकडे नसून यापैकी शासनाने ७५ एकर १५ गुंठे २१ अणे जागा वेगवेगळ्या संस्थांना व प्राधिकरणांना वितरित केल्याचे मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांच्या दिनांक ३ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी रितसर सुनावण्या घेतल्या आणि मानखुर्द व देवनार येथील न.भू.मा. क्र.११५, ११५/१ ते ४९, ११९, १७९ व १७९/१ ते ४ मधील जागेवर झालेले अतिक्रमण दोन महिन्यात काढून टाकण्याचे व जागा मोकळी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी देऊनही कोणतीच अंमलबजावणी न झाल्याने दिनांक ३ मार्च, २०१८ च्या आदेशानुसार उपरोक्त सर्व जमीन शासन जमा करण्याचे आदेश मुंबई जिल्हाधिकाऱ्यांनी देऊन अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी उपजिल्हाधिकारी, चेंबूर यांचेवर टाकली असतानाही उपजिल्हाधिकारी, चेंबूर यांनी अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत तसेच अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही न करणाऱ्या उपजिल्हाधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) शासन ज्ञापन, गृह विभाग दि. ५/४/१९३९ व २५/९/१९३९ अन्वये चिल्ड्रेन एड सोसायटीला मौजे मानखुर्द व देवनार येथील सुमारे १४० एकर जमीन मंजूर करण्यात आली आहे. सदर जमिनीपैकी शासनाने ७५ एकर १५ गुंठे २१ आणे जमीन चिल्ड्रेन एड सोसायटीकडून

काढून घेऊन, वेगवेगळया संस्थांना व प्राधिकरणांना प्रदान केली आहे. चिल्ड्रेन एड सोसायटीला मंजूर केलेल्या जमिनीपैकी काही जमिनीवर अतिक्रमण झाल्यामुळे अतिक्रमणाने बाधीत जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासीत करून अतिक्रमणाखालील जमीन शासन जमा करणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.०३/०३/२०१८ रोजी आदेश पारित केले आहेत.

(२) जिल्हाधिकारी यांच्या उक्त आदेशाच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी (अति./ निष्का.) चेंबुर-२ यांनी अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही सुरू केली. तथापि, एका अतिक्रमणधारकाने जिल्हाधिकारी यांच्या यापुर्वीच्या दि.१६/०८/२०१७ रोजीच्या आदेशाविरूध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेमध्ये "कोणतीही सक्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये" असे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत.

तसेच, जिल्हाधिकारी यांच्या दि.०३/०३/२०१८ च्या आदेशाविरूध्द एका अतिक्रमणधारकाने अपर आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे दाखल केलेल्या अपिलावर अपर आयुक्तांनी दिनांक ०२/०५/२०१८ च्या आदेशान्वये अपिल अर्ज फेटाळून जिल्हाधिकारी यांचे उक्त आदेश कायम केले आहेत. अपर आयुक्त, कोकण विभाग यांचे आदेशाविरूध्द सदर अतिक्रमणधारकाने मा.मंत्री (महसूल) यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या फेरतपासणी अर्जावर मा.मंत्री (महसूल) यांनी दि.२४/०५/२०१८ रोजीच्या आदेशान्वये प्रकरणाच्या अंतिम निर्णयापर्यंत अपर आयुक्त, कोकण विभाग यांच्या आदेशास स्थगिती दिली आहे. त्यामुळे अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही होऊ शकली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राहूरी (जि.अहमदनगर) येथील मुळा धरणात मासेमारीसाठी विषारी औषंधाचा वापर केल्याबाबत

**(६३) * ११७५५७ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहूरी (जि.अहमदनगर) येथील मुळा धरणात मासेमारीसाठी विषारी औषंधाचा वापर करुन मासे मारले जात असून सदरचे अशुध्द मासे बाजारात विक्री केले जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यामुळे १५ ते २० गुंडांनी ठेकेदाराच्या कामगारांना मारहाण केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अशुध्द मासे विक्री करणाऱ्यांसह ठेकेदाराच्या कामगारांना मारहाण करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) होय.

(३) मुळा धरणातील मासेमारीसाठी अज्ञात व्यक्तीकडून विषारी औषधांचा वापर केल्यामुळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे व त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच प्रस्तुत प्रकरणी ठेकेदाराकडून खुलासा मागविण्यात आला असून याबाबत उपाययोजना करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) तालुक्यात बेकायदेशीर वीटभट्ट्या कार्यरत असल्याबाबत

**(६४) * १२२९७३ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यात वीट भट्टीसाठी दिलेल्या परवान्यामधील अटी आणि शर्थींचे उल्लंघन करून असंख्य वीटभट्ट्या कार्यरत असल्याची माहिती माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित विटभट्टीचालकांची तसेच संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार वीट भट्टीसाठी दिलेल्या परवान्यामधील अटी व शर्थींचा भंग करणा-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील स्थानिक मच्छिमारांच्या मागण्यांबाबत

**(६५) * १२०५४८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील स्थानिक मच्छिमारांनी त्यांच्या न्याय मागण्यांसाठी दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्ध्व मानार जलाशयात परराज्यातील मच्छिमारांकडून सुरू असलेली मासेमारी थांबवावी, बेरोजगार झालेल्या मच्छिमारांना मासेमारी उपलब्ध करून द्यावी, दुष्काळजन्य परिस्थितीत मच्छिमार संस्थांचे तलाव ठेके माफ करून शेतकऱ्यांप्रमाणे मच्छिमारांचे कर्ज माफ करावे, जिल्ह्यातील अवैध मच्छिमार संस्थांचे तथा नामधारी अवैध सभासद असलेल्या संस्थांची चौकशी करून त्यांची नोंदणी रद्द करावी तसेच स्थानिक मच्छिमार संस्थांना हेक्टरी ३०० रूपये प्रमाणे तलाव ठेका आकारण्यात यावा या मागण्या नांदेड जिल्ह्यातील स्थानिक मच्छिमारांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छिमारांच्या मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे
(३) उर्ध्व मानार जलाशयातील ठेकेदार संस्थेकडून परराज्यातील मच्छिमारांना मासेमारी परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच त्या जलाशयात परराज्यातील मच्छिमार मासेमारी करताना आढळून आलेले नाहीत.

स्थानिक बेरोजगार मच्छिमारांना मासेमारीसाठी रितसर मासेमारी परवाना दिला जातो. दुष्काळजन्य परिस्थितीत मासेमारी ठेक्यास मुदतवाढ देण्याची तरतुद शासन निर्णयात आहे. निवेदनात उल्लेखित बोगस, अक्रियाशील मच्छिमार संस्थाबाबत उपनिबंधक (मत्स्य) सहकारी संस्था यांचेकडून चौकशी सुरू असुन तलाव ठेक्याच्या धोरणात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) येथील शासकीय निवासस्थानासाठी राखीव असलेली जागा बळकावल्याबाबत

**(६६) * १२१५५० श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी (जि.यवतमाळ) येथील शिट नं.७, भु.नं.१२५१ ही शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी राखीव असलेली जागा अधिकाऱ्यांच्या संगनमताने व्यावसायिकांनी बळकावल्याचे एका निवृत्त सैनिकाने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जागेची मागणी शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी केलेली असतानाही तत्कालिन तहसिलदार यांनी खोटा नमुना ८ तयार करुन नियमबाह्यरित्या शासनाची दिशाभूल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त प्रकरणातील संबंधित अधिकारी, कर्मचारी व व्यावसायिकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) सदरहू प्रकरणी "आपले सरकार" पोर्टलवर दि.१७/०५/२०१८ रोजी तक्रार दाखल झाली होती.

आर्णी, जि.यवतमाळ येथील शिट नं. ७, भूखंड क्र. १२५२ ही जमीन शासकीय कर्मचा-याच्या निवासस्थानासाठी राखीव असल्याची नोंद, "गैर नागरी क्षेत्रातील गावाकरीता हक्क नोंदणी नोंदवहीत" उपलब्ध आहे. या जागेवर पूर्वी झालेले अतिक्रमण एकदा निष्काषित करण्यात आल्यानंतर सदर जागा आर्णी शहरात मध्यवर्ती ठिकाणी असल्याने तेथे पुनश्च: अतिक्रमण होण्याची शक्यता विचारात घेवून तसेच सदर जागेचा लिलाव केल्यास मोठ्या प्रमाणात महसूल गोळा होवू शकतो ही बाब लक्षात घेता तत्कालीन जिल्हाधिकारी यांची मान्यता घेवून तत्कालीन तहसिलदार, आर्णी यांनी सदरहू जमिनीचा लिलाव केला आहे.

सन २००६ च्या शिघ्रसिध्द गणकानुसार उक्त भूखंड क्र. १२५२ च्या ५२६.०१ चौ. मी. क्षेत्रफळाची किंमत रुपये ३,१५,६०६/- होती. परंतू प्रत्यक्षात जाहीर लिलावाद्वारे रुपये ५६.५१ लाख इतकी रक्कम शासनास प्राप्त झाली आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांकरीता आर्णी येथे स. नं.४६/३, प्रचलित गट नं.१७५ मध्ये एकूण ८ निवासस्थानांसह तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालये बांधण्यात आली आहेत.

सदर लिलावाच्या प्रक्रियेमध्ये काही अनियमितता झालेली आहे किंवा कसे याविषयी विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचा अहवाल मागविण्यात आला आहे.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यात डोंगर पोखरून मातीचे उत्खनन करण्यात येत असल्याबाबत

**(६७) * १२२५०८ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यात डोंगर आणि लहान टेकड्या पोखरून मोठ्या प्रमाणात मातीचे उत्खनन सुरू असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अनधिकृत उत्खननामुळे अनेक वृक्ष मुळासकट काढुन टाकले जात असून त्याचा विपरीत परिणाम पर्यावरणावर होत असल्याचे तसेच यामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचेही नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार खालापूर तालुक्यात डोंगर पोखरून मातीचे उत्खनन करणाऱ्या भूमाफीयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) दि.१७/०४/२०१८ रोजी "खोपोली डोंगरात अवैध उत्खनन" या मथळ्याखाली एका वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीमध्ये नमुद ठिकाणी केलेल्या चौकशीमध्ये अवैध उत्खनन आढळून आले नाही. तसेच खालापूर तालुक्यातील इतर ठिकाणी अशी बाब निदर्शनास आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घारपी-उडेली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील जमिनीवर केरळ येथील नागरिकांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(६८) * ११८२५७ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घारपी-उडेली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) या ग्रामपंचायतीच्या ११० एकर, भूमिहीनांच्या २६० एकर तसेच ग्रामस्थांच्या ४०० एकरपेक्षा अधिक अशा एकंदरीत ८५० एकर जमिनीवर केरळ येथील नागरिकांनी अतिक्रमण करुन रबराची लागवड केली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीनीचे सातबारा व इतर दस्तऐवज तपासण्याचे आदेश प्रांताधिकाऱ्यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर जमीनीवर अतिक्रमण करणाऱ्या केरळ येथील नागरिकांवर कारवाई करून जमिनी ग्रामस्थांना परत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मौजे घारपी-उडेली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) या ग्रामपंचायतीच्या ११० एकर भूमिहीनांच्या २६० एकर तसेच ग्रामस्थांच्या ४०० एकरपेक्षा अधिक व एकंदरीत ८५० एकर, जमिनीवर केरळ येथील नागरिकांनी अतिक्रमण करुन रबरची लागवड केल्याबाबतची बाब माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केडगांव (ता.दौंड, जि.पुणे) येथील उड्डणपूलावरील पथकर वसूली बंद करण्याबाबत

**(६९) * १२३९७२ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केडगांव (ता.दौंड, जि.पुणे) रेल्वेस्टेशन जवळील राज्य मार्ग क्र.६२ वर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधण्यात आलेल्या रेल्वे उड्डाणपूलाची पथकर वसुलीची मुदत सन २०११ मध्ये संपल्यानंतरही सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन निर्णय क्र.खाक्षेस-२००९/प्र.क्र.१८/रस्ते-८, दिनांक २२ सप्टेंबर, २०११ अन्वये दिनांक २३ सप्टेंबर, २०११ ते १६ एप्रिल, २०१८ या कालावधीसाठी नव्याने पथकर वसुलीचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती वेळा उक्त पथकर वसुलीस मुदत वाढवून देण्यात आली आहे व मुदतवाढ देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर पथकर वसुलीची मुदत अनेक वेळा वाढवूनही पथकर वसूल होत नसल्याचे कारण देत पथकर वसुलीची मुदत दिनांक ३१ मार्च, २०२८ पर्यंत वाढवून देण्याबाबताचा प्रस्ताव दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी शासनास सदर केला असल्याने पथकराची उर्वरित रक्कम सदर कंत्राटदारास परत करून पथकर बंद करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक ०७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर रस्त्यावरील पथकर वसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) सदर प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचना क्र. खाक्षेस-२००९/प्र.क्र.१८/रस्ते-८, दि.२२.०९.२०११ च्या आदेशान्वये २३.०९.२०११ ते १६.०४.२०१८ पर्यंत पहिली मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच मा. प्रधान सचिव, सा. बां. विभाग यांचे पत्र क्र. निरंक दि.१६.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये केडगाव रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामाच्या खर्चाची प्रतीपूर्ती न झाल्याने शासनाकडून पुढील आदेश प्राप्त होईपावेतो मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) होय.

(४) माहे जानेवारी, २०१८ अखेर सदर केडगाव रेल्वे उड्डाणपुलाच्या खर्चाची रक्कम रु. २०६८ लक्ष इतकी म.रा.र.वि.महामंडळास येणे बाकी असल्यामुळे यासंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिशोर-सिल्लोड (जि.औरंगाबाद) रस्त्यावरील पूलावर बेकायदेशीर बांधकाम केल्याबाबत

**(७०) * १२२०६२ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिशोर-सिल्लोड (जि.औरंगाबाद) रस्त्यावर रिलायन्स जिओ कंपनीकडून ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याचे काम सुरु असून संबंधित कंत्राटदाराने खोदकाम करताना शासनाचे नियम डावलून पूलावर बेकायदेशीर बांधकाम केले असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार पिशोर-सिल्लोड रस्त्यावरील पूलावर बेकायदेशीर बांधकाम करणा-या कंत्राटदार, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

रिलायन्स जिओ कंपनीने दोन पुलांवर बाहेरच्या बाजूने केबल टाकली होती. पुलावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यात आलेले नाही.

(२) व (३)

सदर बाब निदर्शनास आल्यानंतर पुलावरील केबल खात्यामार्फत काढून टाकण्यात आली आहे. सबब, कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तीनाथ देवस्थानच्या जमिनीचे बेकायदेशीररित्या हस्तांतर केल्याबाबत

**(७१) * १२४१६२ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तीनाथ देवस्थानच्या गट क्रमांक ३५४ मधील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर १९७८-१९७९ मध्ये इनाम हा शेरा भूधारणाखाली नोंदविला असून सदरहू शेरा कमी करुन ही जमीन हस्तांतर करण्यात आल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार उक्त देवस्थानच्या जमिनीचे बेकायदेशीररीत्या हस्तांतर करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मौजे. त्र्यंबकेश्वर येथील गट नं.३५४ म्हणजेच स.नं.६३१ हा पूर्वीचा स. नं.४३२/अ असल्याचे गटस्किम उता-यावरून दिसून येते. सदर गावचे ॲलिनेशन नोंदवही तसेच इनाम पत्रक पाहता सदरच्या सर्व्हे नंबरची इनाम म्हणून नोंद नसल्याचे दिसून येते. तसेच गाव नमुना नंबर ७/१२ अभिलेखातही संत निवृत्तीनाथ देवस्थानाची नोंद दिसून येत नाही. मात्र, सन १९७८-७९ मध्ये गटस्किमनुसार गाव नमुना नंबर ७/१२ व पुनर्लेखनाच्या वेळी इनाम शेरा दाखल झाल्याचे आढळून येते. सबब, त्याबाबत सविस्तर चौकशी करून अधिकार अभिलेखाचे कागदपत्र तपासून तत्कालीन तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी सदरचा “इनाम” शेरा हस्तलेखन प्रमाद मानून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ नुसार त्यांचा आदेश दि.२९.०५.२०१२ अन्वये कमी केला आहे.

सदर निर्णयाविरूद्ध श्री.निवृत्तीनाथ समाधी संस्थानामार्फत उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर यांच्याकडे दाखल केलेल्या अपीलात तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांचा निर्णय कायम करण्यात आला आहे. उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर यांच्या निर्णयाविरूद्ध अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे अपील दाखल करण्यात आले होते. सदर अपीलात सुनावणीच्या तारखा देऊन व पुरेशी संधी देऊनही अपिलार्थी यांनी प्रतिवादीपैकी मयत इसमांचे वारस ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधी होऊन देखील रेकॉर्डवर न घेतल्याने अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या दि.२९.०६.२०१८ च्या आदेशान्वये सदरचे अपील कामकाजातून काढून टाकण्यात येऊन प्रकरणी अधिकार अभिलेखाची तपासणी व पडताळणी करणेबाबत उपजिल्हाधिकारी प्रशासन, नाशिक यांच्याकडे मूळ प्रकरण पाठविण्यात आले आहे.

(२) व (३) जमीन बेकायदेशीर रित्या हस्तांतरण झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही, त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील जिल्हा पशुवैद्यकीय दवाखान्याची झालेली दुरवस्था

**(७२) * १२०५५६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) शहरामध्ये जनावरांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी रायगड जिल्हा पशुवैद्यकीय दवाखाना सुरू करण्यात आला असून या दवाखान्याच्या इमारतीची दुरवस्था झाली असल्याने सदरहू इमारत कोसळण्याची शक्याता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दवाखान्यामध्ये अद्यावत शस्त्रक्रिया विभाग नसून एक्सरे मशिन, सोनोग्राफी मशिन जुन्या व नादुरूस्त असल्यामुळे नेमके आजाराचे निदान करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पशुवैद्यकीय विभागाने या दवाखान्याला संरक्षक भिंत बांधण्यासह अन्य सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने रायगड जिल्हा पशुवैद्यकीय दवाखाना सोयी सुविधांसह सुसज्ज करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) नाही.
(२) नाही.

सदर दवाखान्यात शस्त्रक्रिया विभाग अस्तितत्वात असून त्यामध्ये शस्त्रक्रिया केल्या जातात. तसेच सोनोग्राफी मशीन चालु स्थितीत उपलब्ध आहे. तसेच एक्स रे मशीनच्या युपीएसमध्ये किरकोळी स्वरुपाच्या बिघाडामुळे तात्पुरते बंद होते, ते दुरूस्त करून घेण्यात आले असून कार्यरत आहे.

(३) नाही.

तथापि, नवीन संरक्षक भिंत बांधणे व इमारतीमधील काहीकक्षांमध्ये अत्यावश्यक संरचनात्मक बदल करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग व कार्यकारी अभियंता कृषि, बांधकाम वरळी, मुंबई यांच्याकडून बांधकामाचे अंदाजपत्रक मागविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी जिल्हा नियोजन समिती यांच्यामार्फत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण पशुवैद्यकिय दवाखाने/ पशुचिकीत्सालये यांचे बांधकाम, बळकटीकरण आधुनिकीकरण या लेखाशिर्षाअंतर्गत रु. ८५.०० लक्ष नियतव्यय मंजूर झालेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद व लातूर जिल्हयातील टेंभापूरी, जायकवाडी, भुसणी आणि डोंगरगाव धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(७३) * १२२५७३ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद व लातूर जिल्हयातील टेंभापूरी, जायकवाडी, भुसणी आणि डोंगरगाव धरणग्रस्तांचे पुनर्वसन अद्याप प्रलंबित असल्याचे दिनांक ६ फेब्रुवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाची समस्या सोडविण्यासाठी तातडीने प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आदेश विभागीय आयुक्तांनी देवूनही त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन उक्त धरणग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.
(२) व (३) विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडून औरंगाबाद व लातूर जिल्हयातील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी संबंधित ग्रामस्थ व निवेदनकर्त्यांसमवेत यंत्रणेची बैठक आयोजित करण्यात आली. धरग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या समस्या सोडविण्यासाठी सर्व संबंधितांना त्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या त्यानुसार लातूर जिल्हयातील भुसणी निम्न पातळी बंधाऱ्यामुळे बाधित झालेल्या एकूण ७३ पैकी ०५ शेतकऱ्यांची पर्यायी जमिनीची मागणी केली आहे. सदर ५ शेतकऱ्यांना प्रत्येकी १.६० हेक्टर प्रमाणे उपलब्ध असलेली ८.०० हेक्टर शेतकऱ्यांच्या पसंतीनुसार जमिनीचे वाटपाची कार्यवाही करण्यात येत होती. तथापि लाभ क्षेत्रातील शेतक-यांनी विरोध केल्यामुळे प्रलंबित आहे. सदर शेतक-यांना निर्वाहभत्ता मंजुरीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

लातूर जिल्हयातील डोंगरगाव उच्च पातळी बंधाऱ्यातील एकूण ५४ बाधीत शेतकऱ्यांपैकी १९ शेतकऱ्यांनी पर्यायी जमिनीची मागणी केली आहे. त्यापैकी १५ शेतकऱ्यांनी पर्यायी जमिनीची मागणी परत घेतली असून उर्वरित ४ शेतकऱ्यांची प्रत्येकी २० आर पेक्षा कमी क्षेत्र संपादित झालेले असल्याने महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील तरतूदीनुसार त्यांना पर्यायी जमिन अनुज्ञेय नाही. डोगरगाव उच्च पातळी बंधा-यासंबधीची कलम ११ व १३ ची अधिसूचना प्रसीध्द केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.